रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ३३३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ रविवार, २१ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
'योग दिनाच्या उत्सवात सर्वांनी सहभागी व्हावे' / २
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख / ४
भारतीय महिला हॉकी संघाची घोडदौड / ८

## आज नीट यूजी फेरपरीक्षा; कडेकोट सुरक्षा व्यवस्था




**नवी दिल्ली :** वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी होणारी राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट-यूजी २०२६) रविवारी (दि. २१) पुन्हा घेतली जाणार आहे. पेपरफुटी आणि परीक्षा प्रक्रियेतील अनियमिततेच्या आरोपांनंतर केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) यांनी यापूर्वीची परीक्षा रद्द करून फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला होता. देशभरातील सुमारे २२ लाखांहून अधिक विद्यार्थी ही फेरपरीक्षा देणार आहेत. फेरपरीक्षा दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत ऑफलाइन (पेन आणि पेपर) पद्धतीने घेतली जाणार असून यावेळी विद्यार्थ्यांना १५ मिनिटांचा अतिरिक्त वेळ देण्यात आला आहे. परीक्षा केंद्रांवर कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. बायोमेट्रिक पडताळणी, सीसीटीव्ही देखरेख, एआय-आधारित निरीक्षण आणि बहुस्तरीय तपासणीची व्यवस्था तैनात असणार आहे.

### पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणाचा निकाल जाहीर
# सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

**मुंबई : प्रतिनिधी**

तब्बल दोन दशकांपासून चर्चेत असलेल्या पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणाचा निकाल अखेर शनिवारी (दि. २०) लागला. सीबीआय विशेष न्यायालयाने माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.

काँग्रेस नेते पवनराजे निंबाळकर यांची ३ जून २००६ रोजी हत्या करण्यात आली होती. पवनराजे हे मुंबईहून धाराशिवकडे जात असताना पनवेलजवळील कळंबोली येथे त्यांची मोटार अडवून गोळीबार करण्यात आला होता. त्यात पवनराजे आणि त्यांच्या कारचा चालक समद काझी




याचा मृत्यू झाला होता. या प्रकरणामध्ये पद्मसिंह पाटील यांच्यासह सतीश मंदाडे, मोहन शुक्ल, शशिकांत कुलकर्णी, कैलाश यादव, दिनेश तिवारी, पिंटू सिंह आणि छोटे पांडे यांना आरोपी करण्यात आले होते.

याप्रकरणी सुरुवातीला कळंबोली पोलिसांनी तपास केला होता. पुढे हा तपास सीबीआयकडे वर्ग करण्यात आला होता. तपासानंतर सीबीआयने पद्मसिंह पाटील यांच्यासह नऊ जणांविरोधात आरोपपत्र दाखल केले होते, तर आरोपी पाटील यांच्या वतीने सुमारे १,२५० पानांचे लेखी निवेदन न्यायालयात सादर करण्यात आले होते.

यावर निकाल देताना सीबीआय विशेष न्यायालयाचे न्यायमूर्ती एस. आर. नावंदर यांनी संपूर्ण खटला माफीचा साक्षीदार पारसमल जैन यांच्या साक्षीवर आधारित होता, मात्र त्यांच्या जबाबांत अनेक विसंगती, विरोधाभास व संशयास्पद बाबी आढळल्याने ती साक्ष विश्वासार्ह मानता येत नाही, असे नमूद केले व सर्व आरोपींना संशयाचा फायदा देत निर्दोष मुक्त केले.

### हायकोर्टात दाद मागणार -खासदार ओमराजे निंबाळकर

निकालानंतर स्व. पवनराजे निंबाळकर यांचे पुत्र आणि धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी हा निकाल दुर्दैवी आहे. २० वर्षांपासून आरोपींना शिक्षा व्हावी यासाठी अखंडपणे आम्ही आणि तपास यंत्रणा प्रयत्न करत होत्या. या निकालाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार आहोत, अशी प्रतिक्रिया दिली. माननीय कोर्टाच्या निकालावर भाष्य करण्यापेक्षा हायकोर्टात अपील करून त्यांना सगळ्या गोष्टी पटवून देणे महत्त्वाचे आहे, असेही ते म्हणाले.

# प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना युवाशक्तीला नवी दिशा देणारी
### ■ आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली राबविण्यात येत असलेली प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना ही देशातील युवकांना रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य प्रदान करणारी महत्त्वपूर्ण योजना असल्याचे प्रतिपादन भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथे केले.



पनवेल शहरातील फडके नाट्यगृहात ईपीएफओ वाशी कार्यालयाच्या वतीने प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना लाभ वितरण कार्यक्रम शुक्रवारी (दि.१९) आयोजिण्यात आला होता. त्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नितीन पाटील, प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त डॉ. रामकृष्ण त्रिपाठी, मनोज माने, सहाय्यक आयुक्त एस.एच. संघानी, सुश्री आकांक्षा पटेल यांच्यासह ईपीएफओ अधिकारी, कर्मचारी, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रोजगारनिर्मिती, आर्थिक समृद्धी आणि सामाजिक सुरक्षा मजबूत करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजनेंतर्गत कर्मचारी भविष्य निधी संघटना प्रोत्साहन वितरण समारंभ दिल्लीतील विज्ञान भवन येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झाला. याचे थेट प्रक्षेपणही दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले होते. या मार्गदर्शनाचा लाभ उपस्थितांनी घेतला.


यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, विकसित भारत २०४७ या संकल्पनेची पूर्तता करण्यासाठी केंद्र सरकार रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, उद्योजकता आणि सामाजिक सुरक्षा या क्षेत्रात अभूतपूर्व कार्य करत आहे. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना ही युवकांना औपचारिक रोजगाराशी जोडणारी आणि उद्योगांना नवीन रोजगारनिर्मितीसाठी प्रोत्साहन देणारी महत्त्वाची योजना आहे. ईपीएफओ वाशी क्षेत्रातील ११ हजार ८२७ प्रतिष्ठाने या योजनेच्या कक्षेत येतात. त्यापैकी सात हजार ३९१ प्रतिष्ठानांनी नोंदणी केली असून एक लाख १४ हजार ८८०हून अधिक नव्या कर्मचाऱ्यांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. हा केवळ आकडा नसून हजारो कुटुंबांच्या जीवनात आशा, सन्मान आणि आर्थिक सुरक्षितता निर्माण करणारा टप्पा आहे. देशभरातील लाभार्थ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुमारे २४०० कोटी रुपयांचे प्रोत्साहन अनुदान थेट लाभ हस्तांतरणद्वारे वितरित करण्यात येत असल्याचे सांगून ही रक्कम युवकांच्या उज्ज्वल भविष्यातील गुंतवणूक असल्याचेही नमूद केले.

नवी मुंबई व पनवेल परिसरात वेगाने होत असलेल्या विकासकामांमुळे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. विमानतळ, वाढती औद्योगिक गुंतवणूक, लॉजिस्टिक्स आणि सेवा क्षेत्राचा विस्तार यामुळे हजारो युवकांना रोजगार मिळणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. यावेळी त्यांनी उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींना अधिकाधिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे, तर युवकांनी कौशल्य विकास, आधुनिक तंत्रज्ञान आणि नव्या संधींचा स्वीकार करून विकसित भारताच्या निर्मितीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

# पनवेलमधील घेरावाडी प्रकाशाने उजळली!
### आमदार महेश बालदी यांच्या हस्ते वीज सुविधेचा शुभारंभ

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील आपट्याजवळील घेरावाडीला अखेर वीज जोडणी मिळाल्याने येथील अंधार कायमचा दूर झाला आहे. या ऐतिहासिक कामाचा लोकार्पण सोहळा शुक्रवारी (दि.१९) कार्यतत्पर आमदार महेश बालदी यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात झाला. आदिवासी बंधू-भगिनींच्या घरात पहिल्यांदाच विजेचा



प्रकाश पोहचल्याने संपूर्ण घेरावाडीत दिवाळीसारखे वातावरण पाहायला मिळाले.

आमदार महेश बालदी यांच्या जिल्हा वार्षिक नियोजन निधी अंतर्गत या महत्त्वपूर्ण कामाचे नियोजन करण्यात आले होते, जे प्रयत्न व पाठपुराव्यामुळे यशस्वी झाले. कार्यक्रमास रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, गटविकास अधिकारी समीर वाठारकर, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, मयूर शेलार तसेच अतुल घरत, सदाशिव वास्कर, एम.के. गडगे, विद्याधर जोशी, रत्नाकर घरत, ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर भोईर, उपसरपंच असद पिट्टू, एमएसीबीचे श्री. देशमुख, ग्रामपंचायत सदस्य मारुती चव्हाण, दामू माडे, दर्शन भोईर, सुहास कदम, राजू देशमुख, महेंद्र टेंबे, धोंडू चव्हाण, शिवदास भोईर, परेश भोईर, दामू माडे, गणपत पिरकड, धर्मी वाघ, राम पारधी, मंगल्या माडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. (पान २ वर..)

## सभामंडपाचे बांधकाम कोसळून सात जणांचा मृत्यू

**मानवत : प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्याच्या मानवत तालुक्यातील यशवाडी येथील प्रसिद्ध त्रिमूर्ती हनुमान मंदिरात सुरू असलेल्या सभामंडपाच्या बांधकामाचा स्लॅब शनिवारी (दि.२०) दुपारी ३च्या सुमारास कोसळला. या दुर्घटनेत सात भाविकांचा मृत्यू झाला असून ३२ जण जखमी झाले आहेत.

सभामंडप कोसळल्याने अनेक जण त्याखाली दबले गेले. प्रशासनाकडून तत्काळ बचावकार्य सुरू करण्यात आले. जखमींना विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे.

## निवडक

### गणपतीपुळे समुद्रात छत्रपती संभाजीनगरचे पाच जण बुडाले

**गणपतीपुळे :** रत्नागिरी तालुक्यातील गणपतीपुळे येथे पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी आलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील पर्यटकांपैकी पाच जण समुद्राच्या पाण्याचा अंदाज न आल्याने बुडाल्याची घटना शनिवारी (दि.२०) सकाळी घडली. बेपत्ता पर्यटकांचे स्थानिक प्रशासन, पोलीस आणि जीवरक्षक स्थानिक बोटींच्या सहाय्याने शोधकार्य सुरू आहे.

### प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या निधीचे वितरण

**कोलकाता :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. २०) पश्चिम बंगालमधील तारकेश्वर येथून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २३व्या हप्त्याचे अधिकृत वितरण केले. यासह देशभरातील नऊ कोटी ४४ लाखांहून अधिक पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात प्रत्येकी दोन हजार रुपयांची रक्कम थेट जमा करण्यात आली आहे. एकूण १८,८८० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम थेट लाभ हस्तांतरणद्वारे सरकारी तिजोरीतून देण्यात आली आहे. (संबंधित वृत्त पान २ वर..)

## अंबाबाई मंदिर परिसर कॉरिडॉर म्हणून विकसित करणार -केंद्रीय मंत्री अमित शाह



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दक्षिण भारताची काशी म्हणून ओळखले जाणारे करवीर निवासिनी श्री अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिर परिसर सुमारे १५०० कोटी रुपयांचा निधी खर्च करून कॉरिडॉर म्हणून विकसित करण्यात येणार आहे, ही बाब सर्व भाविकांसाठी अत्यंत अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृह तथा सहकारमंत्री अमित शाह यांनी येथे केले.

अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिर विकास आराखड्यांतर्गत १४४५.९७ कोटी रुपयांच्या जतन, संवर्धन आणि परिसर विकासाच्या विविध कामांचा शुभारंभ केंद्रीय मंत्री शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. २०) कोनशिलेचे अनावरण करून करण्यात आला. त्यानंतर पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित कृतज्ञता सोहळा सभेत ते बोलत होते.

सभेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंह भोसले, नगरविकास राज्यमंत्री तथा सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, खासदार धनंजय महाडिक, धैर्यशील माने, आमदार डॉ. विनय कोरे, डॉ.राजेंद्र पाटील-यड्रावकर, अमल महाडिक, चंद्रदीप नरके, डॉ.अशोकराव माने, शिवाजी पाटील, निरंजन डावखरे, जिल्हा परिषद अध्यक्ष शिल्पा खोत, महापौर रुपाराणी निकम, माजी आमदार प्रकाश आवाडे आदी उपस्थित होते.

# भाजपची गव्हाण विभाग नूतन कार्यकारिणी जाहीर
### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकट करण्यासाठी गव्हाण जिल्हा परिषद विभाग आणि वहाळ पंचायत समिती उलवे नोड १च्या नवीन कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१९) झालेल्या कार्यक्रमात नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीची घोषणा लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. यामध्ये गव्हाण जिल्हा परिषद विभाग उलवे नोडच्या अध्यक्षपदी निलेश खारकर, सरचिटणीसपदी संजय नाईक, अखिलेश यादव, रमेश ठाकूर, उपाध्यक्षपदी अभिमन्यू दापोलकर, हरेश्वर म्हात्रे, प्रशांत घरत, दिलीप चव्हाण, चिटणीसपदी रामदास नाईक, भानूदास कडू, मनोज कुमार मौर्या, किरण मढवी, चेतन पाटील, विशाल कोळी, राकेश घरत, कोषाध्यक्षपदी दीपक गोंधळी, राजन घरत यांचा समावेश आहे; तर वहाळ पंचायत समिती उलवे नोड १च्या अध्यक्षपदी वितेश म्हात्रे, सरचिटणीसपदी अंकुश ठाकूर, कुलदीप तिवारी, उपाध्यक्षपदी शैलेश भगत, प्रसाद डोलकर, प्रवीण ठाकूर, रवींद्र शिंदे, चिटणीसपदी गणेश पाटील, विक्रम कोळी, विजय ठाकूर, बळीराम गायकवाड, चिंतामण गोंधळी, देवालय मित्रा, कोषाध्यक्षपदी प्रमोद कडू यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उलवे येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या नियुक्तीपत्र प्रदान कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, माजी सदस्य रत्नप्रभा घरत, भाजप नेते राकेश गायकवाड, युवा मोर्चा पश्चिम मंडळ अध्यक्ष धीरज ओवळेकर, महिला मोर्चाच्या गव्हाण पंचायत समिती अध्यक्ष योगिता भगत, पनवेल पश्चिम मंडळ उपाध्यक्ष सुहास गोंधळी यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी नवनियुक्तांना आगामी वाटचालीसाठी मार्गदर्शन करून शुभेच्छा देण्यात आल्या.

# पनवेलमधील बेघर निवारा प्रकल्पाची पाहणी
### ■ स्थायी समिती सदस्य परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने सेक्टर १२, प्लॉट क्रमांक २ए येथे उभारण्यात येत असलेल्या बेघर निवारा प्रकल्पाची शुक्रवारी (दि.१९) स्थायी समितीचे सदस्य परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरसेवक दशरथ म्हात्रे, नगरसेविका सीताताई पाटील, कुसूम पाटील आदींनी पाहणी केली. यावेळी प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती, सुविधा व बांधकामाच्या गुणवत्तेचा आढावा घेण्यात आला.

बेघर निवारा प्रकल्प एकूण ७५ बेड क्षमतेचा आहे. या प्रकल्पात कुटुंबे व ज्येष्ठ नागरिक, महिला आणि पुरुष यांच्यासाठी स्वतंत्र मजल्यांवर निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे स्वयंपाकघर, स्टोअर रूम, स्वच्छतागृहे, स्नानगृहे, लिफ्ट आणि पाणी साठवणुकीसाठी टाक्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

पाहणीदरम्यान स्थायी समिती सदस्य परेश ठाकूर व महापालिका सदस्यांनी संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांना काम दर्जेदार व नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या तसेच नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ व सुसज्ज निवारा उपलब्ध व्हावा यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत मार्गदर्शन केले.

## अलिबागच्या नवगाव येथे विवाहितेची हत्या; प्रियकराला अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नवगाव परिसरात एका ४२ वर्षीय महिलेची हत्या करण्यात आल्याची खळबळजनक घडला घडली आहे. छाया जगदीश पाटील असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव असून याप्रकरणी निलेश एकनाथ घासे (४२) या प्रियकराला पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान, आरोपीला २३ जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार अलिबाग तालुक्यातील नवेदर-नवगाव येथे राहणाऱ्या छाया पाटीलचे निलेश घासे याच्याशी विवाहबाह्य संबंध होते. दोघांच्यात वाद झाला असता निलेशने रागाच्या भरात छायाची हत्या केली. पोलिसांनी वेगाने तपासाची सूत्रे फिरवून आरोपी निलेश घासे यास अटक केली. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले असता २३ जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे.

# आषाढी यात्रेसाठी 'लालपरी'ही सज्ज!
### एसटीच्या ५,५०० विशेष बसेस धावणार

**मुंबई : प्रतिनिधी**

आषाढी एकादशी यात्रेनिमित्त राज्यभरातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या सुरक्षित, सुलभ आणि सुखकर प्रवासासाठी एसटीच्या पाच हजार ५०० विशेष बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात आले असून राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे.

आषाढी यात्रेदरम्यान लाखो वारकरी पालख्यांसह पायी, रेल्वेने, खासगी वाहनांनी आणि एसटीने पंढरपूरकडे प्रस्थान करतात. भाविकांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी महामंडळाने व्यापक नियोजन केले आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी



संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना महिला सन्मान योजनेंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. त्यामुळे विठुरायाच्या दर्शनाचा प्रवास अधिक किफायतशीर आणि सुलभ होणार आहे.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५,२०० विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सक्षम नियोजन करण्यात आले आहे.

भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पंढरपूर येथे चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बसस्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचे वितरण

## शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेचा २३वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी (दि. २०) पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील तारकेश्वर येथून वितरित करण्यात आला. राज्यातील ९०.८५ लाख शेतकरी कुटुंबांच्या खात्यात सुमारे १,८१७ कोटींची रक्कम जमा करण्यात आल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी यावेळी दिली.



मुंबई येथून कृषिमंत्री दत्तात्रय भरणे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून या कार्यक्रमात सहभागी झाले होते. केंद्र शासनाने शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्नाचा आधार देण्यासाठी फेब्रुवारी २०१९ पासून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी ६,००० रुपये इतकी आर्थिक मदत तीन समान हप्त्यांमध्ये थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा केली जाते.

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना ही शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. महाराष्ट्रातील ९० लाखांहून अधिक पात्र शेतकरी कुटुंबांच्या खात्यात २३व्या हप्त्याचा लाभ थेट जमा करण्यात आला असून यामुळे खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पीएम किसान योजनेचा हप्ता वेळेवर वितरित केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांचे महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांतर्फे आभार व्यक्त करतो.

महाराष्ट्रातील पात्र शेतकरी कुटुंबांना आतापर्यंत २२ हप्त्यांद्वारे सुमारे ४१,०८३ कोटींचा लाभ वितरित करण्यात आला आहे. यंदाच्या २३ व्या हप्त्यात राज्यातील भूमी अभिलेख अद्ययावत, आधार संलग्न बँक खाते व ई केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेल्या ९०.८५ लाख शेतकरी कुटुंबांना सुमारे १,८१७ कोटींचा लाभ थेट हस्तांतरणाद्वारे मिळणार आहे. पीएम किसान योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्यांकडे फार्मर आयडी असणे आवश्यक करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण राज्यातील कृषी विज्ञान केंद्रे, जिल्हा व तालुका कृषी कार्यालये, ग्रामपंचायती, कृषी उत्पन्न बाजार समित्या, संशोधन केंद्रे, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी उत्पादक संघटना तसेच सहकारी संस्थांमध्ये आयोजित करण्यात आले. केंद्र शासनाने २० जून हा दिवस देशभर 'पीएम किसान उत्सव दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार कृषी विभाग, महसूल व वनविभाग तसेच ग्रामविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभर हा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

# विनाहेल्मेट दुचाकीचालकांवर खालापूर पोलिसांची कारवाई

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर पोलीस आणि वाहतूक पोलिसांनी विनाहेल्मेट दुचाकी स्वार यांच्यावर दंडात्मक कारवाई करून दंड वसूल केल्याने दुचाकीस्वारांना घाम फुटला आहे.

खालापूर तालुक्यात चार दिवसात तीन दुचाकीस्वार हे हेल्मेट न घातल्याने जीवाला मुकले आहेत. त्यामुळे रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक आँचल दलाल यांनी रस्ता सुरक्षा आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस प्रशासन व वाहतूक पोलिस यांना विना हेल्मेट वाहन चालवणाऱ्यांवर कडक दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या धडक कारवाईत १०३ दुचाकीस्वार यांच्यावर गुन्हा दाखल करून एक लाख तीन हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.या कारवाईचे कौतुक आणि समाधान व्यक्त होत आहे. चार दिवसात तीन दुचाकीस्वार यांचा हेल्मेट न वापरल्याने मृत्यु झाला आहे.

हेल्मेट न वापरल्याने दुचाकी अपघातात डोक्याला गंभीर दुखापत होण्याचा धोका ७४% पर्यंत वाढतो आणि मृत्यू ओढवण्याची शक्यता सहा पटीने अधिक असते. अपघाताच्या वेळी हेल्मेट थेट डोक्यावर होणारा आघात शोषून घेते, ज्यामुळे डोक्याची कवटी फुटणे आणि मेंदूला होणारे प्राणघातक नुकसान टाळता येऊ शकते. यावेळी खालापूर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन पवार, वाहतूक शाखा खालापूर विभाग उपनिरीक्षक राजेंद्र आरोळे, पोलीस किरण शेळके, जयेश कुथे, अजित सुपेकर, शनिराजे हारजे, कोमल ओंबळे, मनीषा केंद्रे आदींनी ही कारवाई केली आहे. ही कारवाई शुक्रवारी सायंकाळी खालापूर फाटा येथे करण्यात आली. विशेष म्हणजे यात निम्म्यापेक्षा जास्त सुशिक्षित होते.



## महाड शहरात नाते पोस्ट ऑफिसला जागेची आवश्यकता

**अलिबाग :** भारतीय डाक विभागास महाड शहरातील नाते पोस्ट ऑफिससाठी नाते भागात साधारण ४०० ते ६५० चौ. फूट जागेची आवश्यकता आहे. इच्छुकांनी भाड्याच्या अपेक्षित रकमेच्या उल्लेखासहित आपले लेखी अर्ज "अधीक्षक डाकघर रायगड विभाग अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड या पत्यावर दि.०६ जुलै २०२६ दुपारी ३.३० वाजेपर्यंत पाठवावेत, असे आवाहन डाक अधीक्षक रायगड मंडल अलिबाग यांनी केले आहे. पोस्ट ऑफिससाठी ४०० ते ६५० स्क्वे सुव्यवस्थित असलेली जागा हवी. पोस्ट सुचवेल त्या सुधारणा, दुरुस्त्या स्वखर्चाने करून घ्याव्या लागतील.

# 'सीकेटी'त आंतरराष्ट्रीय योग दिनाचा उत्साह ; योगक्रियांचे सादरीकरण

**नवी पनवेल : रामप्रहर वृत्त**

योग म्हणजे शरीर, मन आणि आत्मा यांचा समन्वय साधणारी प्राचीन भारतीय विद्या आहे. याच धर्तीवर भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या निर्देशानुसार जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल येथे शनिवारी (दि. २०) सकाळी ६.४५ वाजता महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाच्या जिमखाना असोसिएशन, राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन अध्ययन तथा विस्तार विभाग आणि आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने या योग सत्राचे आयोजन करण्यात आले होते. सत्राची सुरुवात योग प्रशिक्षकांच्या स्वागताने झाली. महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक बी. डी. आघाव यांनी आर्ट ऑफ लिव्हिंगचे योग प्रशिक्षक चंद्रशेखर



सापळे, शीला कोकडे, संजय म्हात्रे, अजय कसाळकर, युगेंद्र कसाळकर आणि कुणाल पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वृक्षासन, ताडासन, अनुलोम-विलोम, प्राणायाम, ध्यानसाधना आदी योगक्रिया उत्स्फूर्तपणे सादर केल्या.

'एक पृथ्वी-एक आरोग्यासाठी योग' या संकल्पनेतून सर्वांगीण कल्याण आणि पर्यावरणीय सुसंवाद वाढवण्यासाठी योग विद्येचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक बी. डी. आघाव, विज्ञान शाखेच्या प्रमुख जे. एस. ठाकूर, परीक्षा विभागाचे उपनियंत्रक ए. के. दीक्षित, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे विभागप्रमुख एन. सी. वडनेरे, संगणकीय विज्ञान विभागाच्या प्रमुख शुभांगी कांबळे, जिमखाना समितीचे अध्यक्ष व्ही. बी. नाईक, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी आकाश पाटील, नॅशनल कॅडेट कॉर्प्सचे सी.टी.ओ. सागर व्यवहारे, सांस्कृतिक समन्वयक गणेश जगताप यांच्यासह प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. योगसत्राचे सूत्रसंचालन व्ही. बी. नाईक यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिमखाना समिती, राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग या समितीमधील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी झाल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते व संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य नगरसेवक परेश ठाकूर, संस्थेचे सचिव एस. टी. गडदे यांनी शुभेच्छा दिल्या.

## 'योग दिनाच्या उत्सवात सर्वांनी सहभागी व्हावे'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशभरात २१ जून रोजी १२व्या आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ची जय्यत तयारी सुरू असताना आयुष मंत्रालयाने देशभरातील नागरिकांना या ऐतिहासिक उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. आरोग्य, सौहार्द आणि भारताच्या कालातीत योग परंपरेचा हा एक ऐतिहासिक सोहळा असणार आहे.

आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम २१ जून रोजी कोलकाता येथील ऐतिहासिक 'रेड रोड' येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे. या निमित्ताने संपूर्ण देश एकत्र येऊन योगाभ्यास करेल आणि भारताचा योगाचा संदेश जगापर्यंत पोहचवेल, असे केंद्रीय आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले.

नागरिकांना जास्तीत जास्त संख्येने या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन करताना जाधव यांनी, या वर्षी सांस्कृतिक मंत्रालय देशातील १०० ऐतिहासिक आणि महत्त्वाच्या ठिकाणी योग दिन २०२६ च्या कार्यक्रमांचे आयोजन करत असल्याचे सांगितले. यामध्ये भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक स्थळे आणि योगची प्राचीन परंपरा यांचा सुंदर संगम पाहायला मिळेल, असे ते पुढे म्हणाले.

या वर्षी, सांस्कृतिक मंत्रालय भारताच्या प्राचीन संस्कृतीचा वारसा आणि योग साधना यांमधील अनोखा संबंध अधोरेखित करण्यासाठी देशातील १०० महत्त्वाच्या वैशिष्ट्यपूर्ण ठिकाणी योग दिनाचे आयोजन करत आहे. या ऐतिहासिक प्रसंगाचा भाग होण्याचे आणि आंतरराष्ट्रीय योग दिन हा सोहळा संस्मरणीय व यशस्वी करण्यासाठी उत्साहाने योगदान देण्याचे आवाहन जाधव यांनी केले.

# नागरिकांना शुद्ध पाणी देण्यासाठी आम्ही कटिबद्ध

## रोहा नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांचे प्रतिपादन

**रोहा : प्रतिनिधी**

नळ पाणीपुरवठा योजना तोट्यात असूनही नगरपरिषद योजना चालवत आहे. परंतु नागरिकांना शुद्ध पाणी देण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून, पुढील पाच वर्ष पाणीपट्टी वाढविणार नाही, अशी माहिती नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी रोहा अष्टमी नगर परिषदेच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे.



पत्रकारांना विस्तृतपणे माहिती देताना वनश्री शेडगे यांनी नगरपरिषदेने पाणीपट्टी वाढीचा निर्णय घेतला होता. त्याचे ही स्पष्टीकरण दिले आहे.परंतु रोहेकरांना पुन्हा एखदा पाणीपट्टी विषयी माहिती देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.पाणी खर्च ३०२७५००० रु एवढा आहे तर उत्पन्न १३६४९६७६ एवढा आहे. आज ही योजना तोट्यात असले तरी नगरपरिषद ही योजना चालवित आहे.सध्या ही योजना तोट्यात असतानाही चालवली जात आहे. एखादी योजना न नफा न तोटा चालविणे आवश्यक. पण नागरिकांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने ही योजना तोट्यात नगरपरिषद चालवत आहे. तोटा कमी करण्याचा आमचा प्रयत्न आहे. २०२६ ला नळपट्टी वाढ झाल्यानंतर १५ टक्के नागरीकांनी भरली सुध्दा आहे. पण आम्ही शुद्ध पाणी नागरिकांना देण्यास कटीबद्ध आहोत.

खा.सुनील तटकरे महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून रोहा शहरात अनेक योजना राबविण्यात येत आहे असे यावेळी सांगितले.

सभापती मयुर दिवेकर यांनी, रोहा शहरात चांगले पाणी पुरवठा होत आहे. पाण्यापासून नागरीकांना कधीही वंचीत ठेवणारा नाही. चांगला एखादा नवीन प्रस्ताव तयार झाला तर नळ पाणी पट्टी वाढी संदर्भात सकारात्मक विचार करणार आहोत. नळ पाणी पट्टी फार मोठी दर वाढ नाही परंतु मोठी दरवाढ आहे अशी भासवण्याचा विरोधकाचा प्रयत्न आहे. विरोधकांनी उपोषण करण्याचा घाट सोडावा अशी विनंती मी आपल्या माध्यमातून करत आहे असे दिवेकर यांनी यावेळी माहिती देताना सांगितले.

यावेळी मुख्याधिकारी अजयकुमार एडके, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, महेश कोलाटकर, मयुर दिवेकर, निता हजारे, रवी चाळके, नगरसेविका पुर्वा मोहीते, अजित मोरे, प्रशांत कडु, फराह पानसरे आदीसह नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते.

## सीकेटी इंग्रजी माध्यमात योगाचा जागर ; प्राणायामाचा अनुभव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागात मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विशेष योगसत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी, शिक्षक आणि योगसाधकांनी एकत्र येत योगासने, प्राणायाम आणि ध्यानाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

हा दिवस उत्तर गोलार्धातील सर्वात मोठा दिवस म्हणून ओळखला जातो, ज्याला ग्रीष्म संक्रांती असेही म्हटले जाते. या दिवसानंतर सूर्य दक्षिण गोलार्धात प्रवेश करतो. त्यामुळे योग आणि अध्यात्मासाठी हा दिवस विशेष मानला जातो आणि म्हणूनच २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो.

यावेळी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, त्याचे आरोग्यदायी फायदे आणि दैनंदिन जीवनातील उपयुक्तता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. योगामुळे शरीर सुदृढ, मन प्रसन्न आणि बुद्धी एकाग्र राहण्यास मदत होते. योग हा आपल्या भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा असून तो जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनवावा, असे आवाहन त्यांनी केले.

पतंजली योग साधनेच्या साधक कविता नायर व प्रज्ञा शेट्टी यांनी वेगवेगळी योगासने, प्राणायाम यांचे प्रात्यक्षिक केले. सर्व विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेत योगाचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवले. शाळेतील शिक्षकांनीही विद्यार्थ्यांसोबत योगाभ्यास करून निरोगी जीवनासाठी नियमित योग करण्याचा संदेश दिला.



पान १ वरुन

## पनवेलमधील घेरावाडी प्रकाशाने उजळली!

यावेळी आमदार महेश बालदी म्हणाले की, समाजातील शेवटच्या माणसाला त्याच्या उत्थानासाठी जो मदत करेल, तोच खरा सहकारी हा विचार मानणारे आपण सर्व आहोत. आज घेरावाडीत वीज आल्यामुळे निश्चितच एक वेगळा आनंद आहे, कारण दुर्गम भागात वीज नसल्याने नागरिकांचे काय हाल होतात याची आपल्याला जाणीव आहे. येत्या काळात तुमच्या इतर समस्या सोडवण्यासाठीही मी सरकार दरबारी पूर्ण प्रयत्न करेन, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. दरम्यान, स्वातंत्र्यानंतर प्रथमच विद्युत सुविधा आणल्याबद्दल घेरावाडीतील समस्त ग्रामस्थांनी आमदार महेश बालदी यांचे आभार मानले.

## 'रयत'च्या नूतन पदाधिकाऱ्यांचा वाशीत सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दि रयत सेवक को-ऑप बँक लिमिटेड, सातारा यांच्या वाशी शाखेमार्फत रयत शिक्षण संस्थेच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ शुक्रवारी (दि. १९) उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर तसेच समन्वय समिती, माध्यमिक विभाग सदस्यपदी निवड झालेल्या प्रमोद कोळी यांचा सन्मानचिन्ह, शाल,पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभाग, कामोठे-पनवेल कार्यालय प्रमुख संतोष गुजर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त बँकेच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना चांदीचे नाणे, शाल व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. रयत सेवक संघाचे समन्वयक नूरा शेख हेही यावेळी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन वाशी शाखेचे चेअरमन किशोर पाटील, शाखाधिकारी प्रदीप माने, ऑफिसर राहुल मिरगे, कॅशियर प्रेरणा म्हात्रे, किरण नलावडे तसेच अटेंडंट सागर खरात यांनी केले होते. उपस्थित मान्यवरांनी सत्कारमूर्तींना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संस्थात्मक योगदानाचा गौरव केला.



# न्यू इंग्लिश स्कूलमध्ये वह्यांचे मोफत वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, मार्केट यार्ड पनवेल येथे हिमांशू वखारिया व सहकाऱ्यांच्या वतीने विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम शुक्रवारी झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहारा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे माजी सीएफओ चिंतन शरतचंद्र शाह होते. त्यांच्या समवेत राजेंद्र पिसे, बजरंग शिर्के तसेच विद्यालयाचे माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष कल्पेश मोहोकर उपस्थित होते.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख मनीषा पाटील यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयातील विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर करून केली. प्रास्ताविकात मुख्याध्यापक डी.सी. पाटील यांनी विद्यालयाची सद्यस्थिती व भविष्यातील वाटचाल याबाबत माहिती दिली. तसेच उत्सव युवारंभ फाउंडेशनचे विश्वस्त चिंतन शाह यांच्या सहकार्याने विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना गणवेश देण्याचे मान्य झाले असून लवकरच त्याची पूर्तता करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या वाटण्यात आल्या.

मनोगतात राजेंद्र पिसे यांनी फेब्रुवारी-मार्च २०२७च्या दहावीच्या परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात येईल, असे जाहीर केले. चिंतन शाह यांनी विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेऊन कुटुंबासह समाजातील शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांना प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन केले. ज्येष्ठ शिक्षक ठाकूर यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# करंजाडेत आमदार महेश बालदींचा पाहणी दौरा





## नागरी समस्यांवर तातडीने तोडगा काढण्याचे निर्देश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाढती लोकसंख्या लक्षात घेता नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध नागरी समस्या तातडीने निकाली काढण्यासाठी उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी शनिवारी (दि. २०) करंजाडे येथे प्रत्यक्ष भेट देऊन विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. लोकप्रतिनिधी आणि सिडको व महावितरणच्या वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संयुक्त उपस्थितीत झालेल्या या महत्त्वपूर्ण दौऱ्यामुळे करंजाडेतील अनेक रखडलेल्या प्रश्नांना आता गती मिळणार आहे.

या दौऱ्याची सुरुवात सेक्टर ४ कॉलेज फाटा येथील रोजच्या वाहतूक कोंडीच्या समस्येवरील चर्चेने झाली. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी तत्काळ सर्कल व सिग्नल यंत्रणा उभारण्याबाबत तातडीने नियोजन करून लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे निर्देश आमदार बालदी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यानंतर आमदार बालदी यांनी सेक्टर ४ येथील सुरू असलेल्या गार्डनच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून ते काम मंजूर आराखड्यानुसार व अत्यंत गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याचे आदेश सिडको अधिकाऱ्यांना दिले. सेक्टर ४ गार्डन ते त्रिवेणीधाम यांना जोडणारा पूल उभारणे, करंजाडे सर्कल व्हील बांधणे व गार्डनचे उर्वरित काम पूर्ण करून नागरिकांसाठी खुले करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

परिसरातील रस्त्यांची पाहणी करत आवश्यक तिथे स्पीड ब्रेकर बसविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. सेक्टर ५ येथील तलावाचे सुशोभीकरण करून पनवेलच्या वडाळे तलावाच्या धर्तीवर आकर्षक पर्यटनस्थळ विकसित करण्यासाठी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिसरात पिण्याच्या पाणी टाकीचे बांधकाम करण्यासाठी प्राधान्याने आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. करंजाडेतील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याची गंभीर दखल घेत आमदार बालदी यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून नागरिकांना अखंडित वीजपुरवठा देण्याचे कडक निर्देश दिले. करंजाडेच्या विकासासाठी सर्व कामांचा नियमित पाठपुरावा करून ती लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील, असा विश्वास त्यांनी यावेळी ग्रामस्थांना दिला.

यावेळी करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, भाजपचे पश्चिम मंडळ अध्यक्ष रुपेश धुमाळ, अनुज जितेकर, उपसरपंच सागर आंद्रे, माजी सरपंच रामेश्वर आंद्रे, करंजाडे विभागीय उपाध्यक्ष नाथाभाऊ भरवाड, वडघर विभागीय अध्यक्ष समीर कळंबी, कोपर गावचे सरपंच मनुष नाईक, गजानन पाटील, किरण माधवी, विश्व हिंदू परिषद अध्यक्ष प्रदीप गवाणे, भाजप सरचिटणीस प्रथमेश पुंडे, तुषार नागे, भाजप उपाध्यक्ष बाबासाहेब भोसले, भाजप उपाध्यक्ष विनोद शिवे, भाजप संघटक कृष्णा पाटील, किल्लास शेलार, अण्णा पिल्लई, गणेश कदम, यश फणके, सिडकोचे मुख्य कार्यकारी अधिकारी फुलवाड, पितळे, उंबरकर, नियोजन विभागाचे अधिकारी तसेच महावितरणचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी माने, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी साडपुते, कार्यकारी अधिकारी पालवे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजप नेते प्रभूदास भोईर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय कामगार संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष तथा वाहतूक संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रभूदास भोईर यांचा वाढदिवस शनिवारी (दि. २०) विविध सामाजिक उपक्रम राबवून अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल मार्केट यार्डमधील रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात अभीष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्याला भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून प्रभूदास भोईर यांच्या माध्यमातून अविरतपणे सुरू असलेल्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

प्रभूदास भोईर यांच्या चेहऱ्यावर हसू पाहिले की खऱ्या अर्थाने आनंद होतो; असाच आनंद त्यांना परमेश्वर सदैव देवो, अशा शब्दांत त्यांनी प्रभूदास भोईर यांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान, यावेळी प्रभूदास भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल महानगरपालिकेतील सफाई कर्मचारी तसेच कष्टकरी माथाडी कामगारांना रेनकोट आणि छत्र्यांचे वाटप उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

अभीष्टचिंतन सोहळ्याला उरणचे आमदार महेश बालदी, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नगरसेवक अमर पाटील, शशिकांत शेळके, महादेव मढे, नगरसेविका दमयंती भोईर, सरस्वती कातारा, भाजपचे पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, अतुल घरत, रवींद्र पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रभूदास भोईर यांना शुभेच्छा दिल्या.





पनवेल : भारतीय जनता पक्षाचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य निलेश म्हात्रे यांना शनिवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

## भाजप महिला मोर्चा पनवेल मंडळतर्फे मोफत रेसिपी प्रात्यक्षिक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप महिला मोर्चा पनवेल शहर मंडळाच्या वतीने महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या व महिला लोकप्रतिनिधींसाठी आयोजित करण्यात आलेला मोफत रेसिपी प्रात्यक्षिक हा विशेष उपक्रम शुक्रवारी उत्साहात संपन्न झाला. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत स्वतःच्या व कुटुंबाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये, तसेच आहारात पोषणमूल्यांचा समतोल कसा राखावा याविषयी महिलांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्षा तथा नगरसेविका रुचिता लोंढे यांनी केले होते.





प्रात्यक्षिक शिबिरादरम्यान उपस्थित महिलांना रुचकर आणि त्याच वेळी अत्यंत पौष्टिक असणाऱ्या विविध पदार्थांच्या सोप्या रेसिपीज प्रत्यक्ष बनवून दाखवण्यात आल्या. कमी वेळेत आणि घरात उपलब्ध असलेल्या साहित्यापासून आरोग्यासाठी फायदेशीर अन्न कसे तयार करावे याचे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. या उपक्रमाला नगरसेविका दर्शना भोईर, प्रिती जॉर्ज, रुचिता लोंढे, माजी नगरसेविका नीता माळी, डॉ. सुलेखा मोहोकर, सारिका भगत, महिला मोर्चाच्या शहर उपाध्यक्षा कविता ठाकूर, नयना मगदूम, ज्योत्स्ना माळी, वर्षा दलवी, सुमेधा चेहेरा, शिल्पा हाडू, शिल्पा भोईर, सपना पाटील, नेहा डाबके, गौरी समेळ, संध्या समेळ, कल्पना चौघुले यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

## वावेघर ग्रुप ग्रामपंचायतीत उपसरपंचांविरोधात अविश्वास ठराव मंजूर

### विकासकामांना गतीची अपेक्षा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वावेघर, दापिवली व वावेघर ग्रुप ग्रामपंचायतीतील विकासकामे आणि ग्रामस्थांच्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय न झाल्याने १२ सदस्यांनी उपसरपंच जगन्नाथ रामू चव्हाण यांच्या विरोधात अविश्वास ठराव मंजूर केला. ग्रामपंचायतीच्या विकासात्मक कामांमध्ये सातत्याने अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप सदस्यांनी केला आहे. ग्रामपंचायतीच्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर निर्णय रखडत असल्याने सदस्यांमध्ये नाराजी होती.



पाणीपुरवठा, गटार सफाई, ग्रामपंचायत कार्यालय उभारणी, ग्रामनिधीचा विकासकामांसाठी वापर, अनधिकृत बांधकामांवरील नियंत्रण, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच मान्सूनपूर्व तयारी यांसारख्या जनहिताच्या विषयांवर अपेक्षित गती मिळत नसल्याची भावना सदस्यांनी व्यक्त केली. सदस्यांनी दिलेल्या अविश्वास प्रस्तावानुसार उपसरपंच जगन्नाथ चव्हाण विकासकामांमध्ये अडथळे निर्माण करीत होते. ग्रामपंचायतीच्या विकासात्मक व धोरणात्मक निर्णयांना सहकार्य करीत नव्हते. सदस्यांना विश्वासात न घेता मनमानी पद्धतीने कारभार करीत होते आणि त्यामुळे सदस्यांचा त्यांच्यावर विश्वास उरला नव्हता, असे कारण दाखवण्यात आले.

या पार्श्वभूमीवर रवी वाळू राठोड यांच्यासह १० सदस्यांनी अविश्वास ठरावाची नोटीस दिली होती. त्यानुसार कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. ग्रामपंचायत सदस्यांनी सांगितले की, हा निर्णय कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून गावाच्या विकासासाठी आणि ग्रामस्थांच्या हितासाठी घेण्यात आला आहे. गावातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावणे, विकासकामांना गती देणे आणि प्रशासन अधिक प्रभावीपणे चालवणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. येत्या २५ जून रोजी होणाऱ्या सभेत पाणीपुरवठा, स्वच्छता, करवसुली, ग्रामनिधी खर्च, बांधकाम परवानग्या, शासकीय योजना तसेच इतर प्रलंबित विषयांवर ठोस निर्णय घेण्यात येतील, असा विश्वास सदस्यांनी व्यक्त केला.

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले. वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून ग्रामस्थांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देणे हीच आमची भूमिका आहे. गावाच्या विकासासाठी आवश्यक असलेले सर्व निर्णय आता अधिक वेगाने घेतले जातील, असा विश्वास ग्रामपंचायत सदस्यांनी व्यक्त केला आहे.

## बानूबाई वाडीतील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भानुबाई वाडी, रायगड प्राईम एज्युकेशन हेल्थ लर्निंग सर्व्हिसेस (PEHL) या संस्थेच्या वतीने आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने भानुबाई वाडी येथे शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमासाठी श्री. व्ही. एल. कृष्णन आणि त्यांची कन्या ॲड. गायत्री कृष्णन यांनी मदत केली. त्यांच्या सहकार्यामुळे रायगड जिल्हा परिषद शाळा, भानुबाई वाडी येथे इयत्ता १ ली ते ५ वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या ३५ आदिवासी विद्यार्थ्यांना संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य मोफत वितरित करण्यात आले. यावेळी श्री. कृष्णन यांनी विद्यार्थ्यांना आशीर्वाद देऊन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. ॲड. गायत्री कृष्णन यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत मन लावून अभ्यास करण्यासाठी आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रेरित केले.या उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी आनंद व्यक्त करून आयोजक व प्रायोजकांचे मनःपूर्वक आभार मानले.या कार्यक्रमास पहल संस्थेचे समन्वयक मधुकर पुजारी, रत्नाकर घरत तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.



## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग तसेच सहज योगा खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २०) सकाळी १०.३० वाजता आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थी, शिक्षक आणि समाजामध्ये योगाचे महत्त्व पटवून देणे तसेच शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्याबाबत जनजागृती करणे हा होता. या कार्यक्रमांमध्ये खारघर येथील सहज योगा संस्थेच्या अनुभवी प्रशिक्षकांनी योगाचे महत्त्व, त्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोन आणि दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्याचे फायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सहभागींसाठी विविध योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा आणि श्वसन तंत्रांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे या सत्रात सहभाग नोंदविला.

योगाभ्यासादरम्यान ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन यांसारख्या विविध आसनांचा सराव करण्यात आला. तसेच अनुलोम–विलोम, कपालभाती आणि भ्रामरी यांसारख्या प्राणायाम प्रकारांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. ध्यानधारणेच्या माध्यमातून मनाची एकाग्रता, तणावमुक्ती आणि अंतर्मनातील शांततेचा अनुभव घेण्यास सहभागींना प्रोत्साहित करण्यात आले. यावेळी वक्त्यांनी योग हा केवळ व्यायाम नसून जीवन जगण्याची एक सकारात्मक पद्धत आहे, असे सांगितले. आधुनिक जीवनशैलीमुळे वाढणारा तणाव, मानसिक दबाव आणि आरोग्यविषयक समस्या कमी करण्यासाठी योग अत्यंत प्रभावी साधन असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. नियमित योगाभ्यासामुळे शरीर सुदृढ राहते, मन प्रसन्न राहते आणि जीवनात सकारात्मकता वाढते, असा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत प्रभाकर जोशी व खारघरचे नगरसेवक दिनेश खानावकर, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे व प्राध्यापक यांनी सक्रिय सहभाग घेतला. सर्वांनी एकत्रितपणे योगाभ्यास करून "एक पृथ्वी, एक आरोग्य" या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीतून पाठिंबा दिला. या उपक्रमामुळे आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश व्यापक स्तरावर पोहचला आणि योगाबद्दलची जागरूकता अधिक दृढ झाली. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागींचे आभार मानण्यात आले.



कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर व प्रा. महेश धायगुडे यांनी केले तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागातील इतर सर्व सदस्य व आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील इतर सर्व सदस्य व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# गदर एक प्रेमकथा @ वर्षे २५

## देशभक्तीचा ज्वलंत नारा....

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

सिनेमावाले कायमच एका गोष्टीवर खुश असतात ते म्हणजे, पिक्चरला हाऊसफुल्ल गर्दी झाली आहे आणि ती अनेक दिवस, आठवडे, महिने कायम आहे...

शुक्रवार १५ जून २००1 हा दिवस असाच. त्या दिवशी आमिर खान प्रॉडक्शनचा आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'लगान वन अपॉन ए टाईम इन इंडिया' आणि झी टॉकीज निर्मित आणि अनिल शर्मा दिग्दर्शित 'गदर एक प्रेमकथा' हे विशिष्ट कालखंडावरील ऐतिहासिक चित्रपट पडद्यावर आले आणि दोन्ही चित्रपट सुपर डुपर हिट ठरले. लगान हा क्लासिक चित्रपट म्हणून ओळखला जातो आणि गदर मास अपील असलेला चित्रपट म्हणून गाजला. मुंबईत गदरचे मुख्य चित्रपटगृह मराठा मंदिर हे होते. मध्य आणि उत्तर भारतात अनेक ठिकाणी तर गदरचे राऊंड शो हाऊसफुल्ल गर्दीत टाळ्या शिट्यानी गाजले.

हिंदीतील देशभक्तीवरील चित्रपटांची आपली एक परंपरा आहे. मनोजकुमार निर्मित, दिग्दर्शित आणि अभिनित 'उपकार' (१९६५) त्यात विशेष गाजलेला. या चित्रपटातील मेरे देश की धरती सोना उगले गाण्याने देशाच्या कानाकोपऱ्यात अफाट लोकप्रियता मिळवली. तो लाऊड स्पीकरचा काळ होता आणि प्रत्येक राष्ट्रीय सणाची सुरुवात हेच गाणे लावून होत असे. मनोजकुमारने देशभक्तीवरील चित्रपटांचा हुकमी निर्माता, दिग्दर्शक आणि कलाकार अशी आपली प्रतिमा निर्माण केली आणि मग पूरब और पश्चिम, शोर, रोटी कपडा और मकान, क्रांती असे प्रत्येक चित्रपट सुपर डुपर हिटचे यश प्राप्त केले.

चित्रपटाच्या जगात हवंहवंसं वाटणारे यश मनोजकुमारच्या चित्रपटांना नक्कीच मिळाले. असं असले तरी मनोजकुमारच्या चित्रपटात फिल्मी अथवा बेगडी देशप्रेम पाह्यला मिळते अशीही टीका करणारा एक वर्ग होता आणि आजही आहे. हमखास ओलेती नायिका हेच का देशप्रेम असा टीकेचा सूर असे. रोटी कपडा और मकान या चित्रपटातील झीनत अमानचे अतिशय मुसळधार पावसातील हाय हाय यह मजबूरी गाणं आणि त्यातील झीनत अमानची उन्मादक नृत्य शैली, क्रांती चित्रपटातील हेमा मालिनीचे ओलेते रूप या गोष्टींची बरीच चर्चा रंगली. मनोजकुमार आपल्या चित्रपटात कधी एकादा नायिकेवर जबरदस्ती करण्याचे दृश्यही वादाचे ठरे. रोटी कपडा और मकान या चित्रपटात मौशमी चटर्जीवर अभिनेता सी.एस. दुबे असा प्रयत्न करतो असे दृश्य आहे. असं असले तरी मनोरंजनाच्या वेष्टनात मनोजकुमार देशभक्तीचा डोस देतो हे दुर्लक्षित करता येणार नाही असे मानणाराही एक समर्थक वर्ग आहे. त्याच्या चित्रपटाचा आपला एक हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण झाला हे यश उल्लेखनीय.

मेहुलकुमारही तिरंगा, क्रांतीवीर, मृत्यूदाता, कोहराम अशा चित्रपटांनी देशभक्तीवरील चित्रपटांचा दिग्दर्शक म्हणून ओळखले गेले. नाना पाटेकरने मेहुलकुमारच्या तीन चित्रपटांत भूमिका साकारली हे विशेष उल्लेखनीय. देशभक्तीवरील चित्रपटांची आपली एक वेगळी वाटचाल सुरू आहे. त्यातील काही नावे सांगायची, तर जे.पी. दत्ता दिग्दर्शित बॉर्डर, आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित स्वदेस, राकेश ओमप्रकाश मेहरा दिग्दर्शित रंग दे बसंती, आदित्य धर दिग्दर्शित उरी द सर्जिकल स्ट्राईक, अनुराग सिंग दिग्दर्शित केसरी असे काही चित्रपट सांगता येतील.

गदर एक प्रेमकथा या सगळ्या चित्रपटांपेक्षा वेगळा. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या देशाची हिंदुस्थान आणि पाकिस्तान अशी फाळणी झाली, त्या पार्श्वभूमीवरील ही ज्वलंत अशी एक प्रेमकथा. उत्तर भारतातील सीमा भागातील जनतेच्या मनात या फाळणीच्या जखमा खोलवर रूजल्या आहेत.

तारासिंग (सनी देओल) आणि सकिना (अमिषा पटेल) यांचे निस्सीम प्रेम आणि त्याला सकिनाचे पिता अशरफ अली (अमरीश पुरी) यांचा असलेला कठोर विरोध याभोवती ही कथा पटकथा रंगते. यांच्या जोडीला उत्कर्ष शर्मा, ओम पुरी, विवेक शौक, अमिता खोपकर, श्वेता शिंदे, प्रतिमा काझमी, राकेश बेदी, विश्वजीत प्रधान इत्यादींच्या प्रमुख भूमिका. आनंद बक्षी यांच्या गीतांना उत्तम सिंग यांचे संगीत आणि यातील मुसाफिर जानेवाले, मै निकला गढ्ढी ले के, उजडा काले कव्वा अशी सगळीच गाणी लोकप्रिय. 'झी'चा चित्रपट असल्याने या चित्रपटातील गाण्यांना भरपूर कव्हरेज, प्रमोशन मिळाले आणि ती गाणी लोकप्रियही झाली.





सनी देओलची जोरदार शोरदार डायलॉगबाजी हे या चित्रपटाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य. सनी देओल शत्रूवर तुटून पडतो ही गोष्ट प्रेक्षकांना कायमच आवडणारी, पण ते पटकथेच्या ओघात यायला हवे. ते मग हुकमी मसालेदार मनोरंजक करणारे.

दिग्दर्शक अनिल शर्मा हा तसा मारधाड ॲक्शन चित्रपटासाठी प्रसिद्ध. श्रद्धांजली (१९८१), हुकुमत (१९८७), ऐलान ए जंग (१९८९), फरिश्ते (१९९१), तहलका (१९९२) असे अनेक चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केले. या चित्रपटातील हुकुमत या चित्रपटाचा मुहूर्त मला आजही आठवतोय. वांद्रे बॅण्ड स्टँड येथील हॉटेल सी रॉकमध्ये तो भर दुपारी हॉटेलमधील हॉलमध्ये झाला. सदाशिव अमरापूरकर यांच्यावर मुहूर्ताचे दृश्य चित्रित करण्यात आले होते. या चित्रपटात धर्मेंद्र, जयाप्रदा, सदाशिव अमरापूरकर, स्वप्ना इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. फरिश्ते चित्रपटाच्या मुहूर्ताची अतिशय जंगी अशी पार्टी जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये रंगली होती. अनिल शर्मा त्यावेळी आम्हा सिनेपत्रकारांना आवर्जून भेटले. धर्मेंद्र कुटुंबियांचा अतिशय विश्वासू दिग्दर्शक म्हणून अनिल शर्माची ओळख. धर्मेंद्र निर्मित 'अपने'(२००७) या चित्रपटाचे दिग्दर्शन अनिल शर्माकडे होते आणि त्यात धर्मेंद्र, सनी देओल, बॉबी देओल आणि कतरिना कैफ यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

अशा सुपर डुपर हिट गदर एक प्रेमकथा या चित्रपटाचा पुढचा भाग अर्थात सिक्वेल पडद्यावर आला नसता तर त्यात आश्चर्य होते. २०२३ साली 'गदर २' पडद्यावर आला, पण तो वादळ निर्माण करू शकला नाही. काही प्रमाणात व्यावसायिक यश प्राप्त झाले ही पहिल्या 'गदर'ची पुण्याई. एकदा सुपर डुपर हिट ठरलेला चित्रपट हा कायमच लोकप्रिय असतोच असतो. चित्रपट अभ्यासात हेदेखील अधोरेखित व्हायला हवे. हिट चित्रपट काळासोबत पुढील पिढीला ज्ञात होत जातो.

गदर एक प्रेमकथा या चित्रपटाची आता खास आठवण काढली जाते आहे, याचं कारण आमिर खान प्रॉडक्शनचा राजकुमार संतोषी दिग्दर्शित 'बटवारा १९४७' हा चित्रपट. हीदेखील देशाच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवरील नाट्यमय गोष्ट. असगर वजाहत लिखित 'लाहौर नही देख्या, ओ जाम्या ओ नही' या साहित्य कृतीवर आधारित भव्य दिव्य दिमाखदार चित्रपट आहे. या चित्रपटाच्या निर्मितीच्या खर्चात आणि मेहनतीत कसलीही कसर ठेवण्यात आलेली नाही. या चित्रपटात सनी देओल मध्यवर्ती भूमिकेत आहे आणि या चित्रपटाच्या प्रसिद्धीचा सगळाच फोकस सनी देओल आणि गदर एक प्रेमकथा हा चित्रपट असा ठेवण्यात आला आहे. एक प्रकारे चित्रपट निर्मितीत एक प्रकारची इतिहासाची पुनरावृत्ती होत आहे. १४ ऑगस्ट २०२६ रोजी आपल्या देशात तसेच जगभरातील अनेक देशांमध्ये हा चित्रपट प्रदर्शित होईल.


या चित्रपटाच्या निमित्ताने दिग्दर्शक राजकुमार संतोषी आणि सनी देओल ही जोडी घायल, घातक, दामिनी या चित्रपटानंतर पुन्हा एकदा एकत्र येईल. या चित्रपटात प्रीती झिंटा, शबाना आझमी, करण देओल, अली फजल, अभिमन्यू सिंग, खुशी हजारे, कनिष्का कपूर इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. जावेद अख्तर यांनी गीते लिहिली असून ए.आर. रहेमान यांचे संगीत आहे.

बराच काळ झाला ए.आर. रहेमान यांचे त्यांच्या दर्जाचे संगीत ऐकायला मिळालेले नाही. त्याना ही एक मोठीच संधी आहे. लगान आणि गदर या चित्रपटाच्या गुणवत्तेत त्यातील गीत संगीत नृत्याचा महत्त्वाचा सहभाग आहे आणि ते चित्रपट एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या युगातील होते. आज आपण मल्टीप्लेक्स युगात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अर्थात व्हीएफएक्स तंत्रज्ञान आणि एआय तंत्रज्ञानाचा वापर तसेच फोर के साऊंड सिस्टीम अशा युगात वावरतोय.

बटवारा १९४७ पाहताना गदर एक प्रेमकथाची आठवण नक्कीच येईल तसेच आपला व्यावसायिक चित्रपट तांत्रिकदृष्ट्या कसा प्रगत झाला आहे याचाही प्रत्यय येईल आणि हा चित्रपट स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने पडद्यावर येत असताना देशभरात असलेल्या देशभक्तीच्या वातावरणाचा त्याला नक्कीच लाभ होईल. 'गदर एक प्रेमकथा'चा पंचवीस वर्षांचा प्रवास एका नवीन टप्प्यावर येऊन पोहचला आहे.

---

# योग परंपरा



इसवी सनापूर्वी आपल्या पतंजली मुनींनी, प्राचीन भारतीय योग प्रथांचे संकलन आणि पद्धतशीर मांडणी, पतंजली योगसूत्र नावाने केली. त्यानंतर आपल्या देशातल्या असंख्य योगींनी ती परंपरा चालू ही ठेवली होती, पण नंतर ती काळाच्या ओघात काहीशी विस्मृतीत गेली. मग जसे भारतातले वैद्यक शास्त्र पुढे जात गेले, तसे योगविषयीही खूप संशोधन झाले.

जशी आपल्या शरीरात सात मुख्य ऊर्जा चक्र (केंद्र) आहेत तसेच जनतेत योगप्रेमाचे चक्र फिरवून त्याची सवय लावण्याचे मोठे काम या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

प्रत्येक गोष्टीला वैज्ञानिक निकषाने मोजण्याच्या पद्धतीचे आव्हान असते. स्वामी कुवलयानंदांनी १९२४मध्ये याची स्थापन करून मुख्यतः तिथे योगाचे ज्ञान, विज्ञानाच्या तत्त्वावर तपासून पाहण्याच्या दृष्टीने सायंटिफिक रिसर्च केला. आधुनिक विज्ञानाची यंत्रे आणून योगाचे मूल्यमापन चालू केले आणि मग अध्यात्मिक अनुभूती ही आधुनिक वैज्ञानिक प्रयोगशाळेत सिद्ध केली.

बंगलोरमध्ये डॉ.एच.आर. नागेंद्र यांनीदेखील स्वामी विवेकानंद अनुसंधान केंद्र येथे असेच संशोधन केले. मग आधी केवळ प्रिव्हेंटिव्ह म्हणून मानली जाणारी ही साधना योग थेरपी म्हणून जागतिक पातळीवर सिद्ध झाली.

आठवतंय साधारण वीस–बावीस वर्षांपूर्वी भारतातल्या बहुतेक तरुणांना मुलांना पहाटे जाग कशाने यायची?... तर त्यांचे आजी–आजोबा टीव्हीवर रामदेवबाबांचे, आस्था चॅनलवरचे, भव्य योग शिबिर बघून त्यांच्याप्रमाणे योगाभ्यास करण्याचा प्रयत्न करत असायचे. रामदेवबाबांनी योग आणि आयुर्वेदाला जागतिक पातळीवर पोहचवले. त्यांनी पतंजली योगपीठ स्थापन केले.

बीकेएस अय्यंगार गुरुजींनी Props Yogaची ही ओळख करून दिली. त्यांनी साधकांना शरीराची अचूक ठेवण साधण्यास मदत करण्यासाठी लाकडी ठोकळे, पट्टे, उषा आणि खुर्च्या यासारख्या साधनांचा वापर सुरू केला. त्यांनी चुंबळ (डोनटच्या आकाराची कापडी कडी) आणि भिंतीला बांधायच्या दोऱ्या यांचाही शोध लावला.

देशातील काही विशेष रुग्णालयांमध्ये (ठाण्यातले सिंघानिया हॉस्पटल) खास योगा सेल चालू होऊन तेथे पारंपरिक पद्धतीने योगसने करू न शकणाऱ्या रुग्णांना सोयीची पडतील अशी उत्पादने ठेवली गेली. गुडघेदुखीमुळे वज्रासनात बसू न शकणाऱ्यांसाठी चौरंगासारखे स्टूल, Backward bendingसाठी आधारभूत अशी अर्धगोलाकार आरामदायी छानशी उत्पादने ज्यामुळे औषधोपचाराबरोबरच रुग्णांसाठीही नियमित योगसाधना हा आनंदसोहळा होऊ लागला.

भारताच्या पहिल्या महिला आयपीएस अधिकारी डॉ. किरण बेदी यांनी तिहार जेलच्या कैद्यांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती कमी करण्यासाठी योग आणि विपश्यनेचा उपयोग केला. यामुळे कैद्यांच्या वर्तनात खूप सकारात्मक बदल झाला. यासाठी त्यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त झाला होता.

पहिला इंटरनॅशनल योगा डे साजरा झाला २१ जून २०१५ला. एकाच वेळी ८४ देशांनी ठरलेली २१ आसने करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड बनवले. आपल्या देशात आयुष मंत्रालय स्थापनेमुळे योग् विषयाला अधिकृत मान्यता मिळाली. यानंतर देशातल्या प्रत्येक शहरातल्या मनापासून योगवर्ग घेणाऱ्या योगशिक्षिकांच्या वर्गांना सर्वांचाच, अगदी गृहिणींचाही अगदी नियमित प्रतिसाद मिळू लागला.

योगशिक्षणाच्या दृष्टीने शाळकरी मुले अजूनही मागेच होती. खरेतर या मुलांवर परीक्षेचा, मार्कांचा, स्पर्धांचा, पालकांच्या अपेक्षांचा प्रचंड ताण आणि यांच्या वागण्या–बोलण्यामुळे त्यांच्या शिक्षकांच्या मनावर प्रचंड ताण. दोघांनाही या योग वर्गाची प्रचंड जरुरी असते.

खरेतर NCERTने १९८५ सालातच शाळेत योग वर्ग कशाप्रकारे घेतले जावे यावर अभ्यासपूर्ण पुस्तक छापले आहे. अगदी प्रत्येक इयत्तेनुसार, पण सीबीएससीच्या शाळांनाही त्या पुस्तकाचा पत्ताच नसतो. बऱ्याचशा शाळेतून, योगाचा तास फक्त टाईम टेबल वर दाखवण्यासाठीच. एरवी तो, फ्री पिरेड, किंवा इतर विषयांचा राहिलेला अभ्यास भरून काढण्याचा पिरेडअसाच असतो.

अशा परिस्थितीत चाळीस वर्षांपूर्वीपासूनच ठाण्याच्या घंटाळी मित्र मंडळसारख्या संस्थेच्या योगाचार्य व्यवहारे गुरुजींनी मेधा संस्कार योग यासारखी शिबिरे घेऊन शाळकरी मुलांवरील उत्तम योग संस्कार केले.

आताच्या काळात आला ॥ायन सौरभ बोथरा. सर्व प्रकारच्या सोशल मीडियाचा अल्गाँरिदम कोळून प्यायलेल्या सहकाऱ्यांबरोबर त्यानेही जागतिक विक्रम प्रस्थापित केले.

एकेकाळी गावोगावी मोठा स्क्रीन लावून सिनेमे पाहिले जायचे. आता अशा स्क्रीनवर, डॉक्टर्स मंडळीचा ग्रुप किंवा इतर प्रोफेशनल्सदेखील ग्रुपने रोजची योग साधना करतात. त्याने आता सर्वच वयोगटांना योगाची आधी आवड मग सवय आणि आता वेड लावले आहे. त्याच्या प्रेमात सध्या देशातला प्रचंड मोठा परिवार आहे. याबद्दल त्याचे प्रचंड कौतुक आहेच.

गेल्या ५० वर्षात हे ऊर्जा चक्र किती जणांनी फिरवून आपल्यापर्यंत आणले आहे, ते आठवण्याचा हा केवळ एक प्रयत्न!

**–मानसी कुलकर्णी,** तक्का, पनवेल

---

# ..आणि मला वाटले मी तिचा बाप बनलो!



ही गोष्ट सुरू झाली मार्च २०२०मध्ये. आमची लेक आणि जावई बंगलोरला रहात असत. लेक आई होणार होती. तिला संपूर्ण बेडरेस्ट होती. त्यामुळे तिला मुंबईत आणणे शक्यच नव्हते. तिच्या सासूबाई आभाताई आणि माझी बायको सुवर्णा यांनी अगदी व्यवस्थित प्लॅन केला होता.

सुवर्णा साधारण फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात बंगलोरला जाणार होती. लेकीची डिलिव्हरी झाली की मी बाळ बघायला जाणार होतो. मग दोन–तीन दिवस राहून मी परत येणार, बाळ महिन्याचे झाले की मग बाळ बाळंतीण मुंबईत आमच्या घरी आणि लेकीच्या सासरी काही महिने राहून बंगलोरला परतणार होते. नंतरही आलटून पालटून विहिणी विहिणी लेकजावयाच्या मदतीला राहणार होत्या.

दोघींनी अगदी जय्यत तयारी केली होती. जानेवारीत बंगलोरमध्येच घरच्या घरी आमच्या सईचं डोहाळजेवण केलं, तेव्हा आम्ही सगळे एकत्र जमलो होतो. सईला फारशी हालचाल करायची नसल्याने कोणाला बोलावता आले नाही, पण ही कसर बारशाच्या वेळी भरून काढायचे ठरवले.

सईच्या डोहाळे जेवणानंतर आम्ही परत आलो. आता सुवर्णा माझी आणि मुख्य म्हणजे आईची सोय लावण्याच्या मागे लागली. आई तशी अगदी अंथरूणाला खिळून होती असे नाही, पण तिला स्वतःचे काही करता येत नसे. तिच्या हातापायात फारशी ताकद नव्हती. तिला हाताने जेवताही येत नसे. आंघोळही स्वतःहून करता येत नसे. तिला हाताला धरून चालवले तर ती हळूहळू चालू शकत असे. फक्त ती जागेपणी सतत अगम्य भाषेत बोलत रहायची. आपण तिच्याशी बोलायला लागलो तर किंवा तिच्यासमोर टीव्ही लावला तर तेवढा वेळ ती बोलायचे बंद होई. सुवर्णा घरी सतत असल्याने ती एका बाईच्या मदतीने आईचे सगळे करे. आईचीही कधीच फारशी तक्रार नसे. तसे तिला सांभाळणे कठीण नव्हते. कधीतरी आम्हाला कुठे जायचे असले तर आमच्या मदतनीस ताई दोन चार दिवस पूर्णवेळ आमच्याकडे रहात. माझी एक मावस बहीण सोबतीला येत असे.

यावेळची गोष्ट वेगळी होती. सुवर्णा महिना दीड महिना बंगलोरला रहाणार होती. इतरवेळी कदाचित आईला घेऊन आम्ही दोघेही बंगलोरला राहिलो असतो, पण सई आणि आई दोघींकडे लक्ष ठेवून बाळाचीही काळजी घेणे सुवर्णाला जमलेच नसते.

सध्या एका ब्युरोतली बाई आणि आमच्या मदतनीस वासंतीताई दोघी मिळून आईची काळजी घेतील आणि ओळखीतल्या एक मावशी दोन वेळच्या जेवणाचा व सकाळच्या नाश्त्याचा डबा घरपोच पाठवतील अशी सोय सुवर्णाने केली होती. सर्व किराणा यथास्थित भरून सुवर्णा बंगलोरला रवाना झाली.

पंधराच दिवसात मार्चमध्ये सतरा तारखेला सई बाळंतीण झाली. छान गुटगुटीत मुलगा झाला. मी बावीस तारखेला बाळ बघायला जाणार होतो, पण कोरोनाने आमचे सगळे प्लॅनिंग बिघडवले! बाळ जन्माला आले आणि दुसऱ्या दिवशी सारे काही ठप्प झाले.

इथे मला ब्रम्हांड आठवले! आता काय करायचे हा मोठा प्रश्न माझ्यासमोर आऽ वासून उभा राहिला. रात्री राहणाऱ्या ब्युरोच्या ताई सकाळी आईला आंघोळ घालून गेल्या आणि नऊला येणाऱ्या ताई येऊच शकल्या नाहीत. डबापण येऊ शकणार नाही असा फोन आला. मी मटकन् खालीच बसलो. आता काय करायचे ? मला काहीही सुचेना. इतक्यात सुवर्णाचा फोन आलाच. "अहो देशभरात घराबाहेर पडायला बंदी केलीय. तिथे काय परिस्थिती आहे? आपल्या ताई आल्या का? तुमच्या जेवणाची काय व्यवस्था? तरी मी सांगत होते निदान कुकर लावायला शिका. काही नाही तर वरणभात तरी खाता येतो. आई कशा आहेत?" तिला टेंशन आलंय हे मला कळत होते. मला वाटले एक दिवसाचाच प्रश्न आहे. एक दोन दिवसांतच पुन्हा सारे सुरळीत होईल.

मी अगदी सहज सुरात म्हणालो. "अगं एखाद दिवसाचा प्रश्न आहे. मी करेन मॅनेज. तू नको काळजी करू." "अहो कुठल्या जगात वावरताय? हा लॉकडाऊन किती दिवस चालेल सांगता येणार नाही. मी काय सांगते ते नीट ऐका. शेजारच्या सुलभाताई तुम्हाला दोन वेळच्या जेवणाचा डबा देतील, पण बाकी सगळे तुम्हालाच पहावे लागेल. अगदी आईंचेदेखील तुम्हालाच करावे लागणार आहे. आपल्याकडे सध्या दुसरा पर्याय नाही."

"बरं बरं मी करेन सगळं ठीक. तू सईकडे बघ . बाळ कसे आहे?" "इथे सगळं ठीक आहे. इथलं मॅनेज करायला मी खंबीर आहे. तुमचंच टेंशन आलंय. तुम्हाला चहा सोडला, तर इतर काहीही बनवता येत नाही."

तिने आईचे करावे लागेल असे सांगितले तेव्हा माझ्या मनात आले की आता आईला भरवायला सहज जमेल त्याचा काय एवढा इश्यू करायचा? ऑफिसमध्ये एचआरला एवढा स्टाफ सांभाळायचो, किती गोष्टी मॅनेज करायचो. साधं घर सांभाळता न यायला काय झालं? या बायका नं उगाच बाऊ करतात. आईचं सकाळचं आवरून झालंच होतं. घरात मात्र पसारा होता. झाडू मारणे, कपडे मशीनला लावणे, कालची भांडी घासून जागेवर ठेवणे. मी सगळी कामे करेस्तोवर बारा वाजले. मी आधीच शहाणपणा करून आईसमोर टीव्ही लावून ठेवला होता. तेवढ्या दोन तीन तासांत मी घर आवरलं. आंघोळ करून देवपूजा उरकली. शेजारच्या सुलभाताईंनी गरमागरम डबाही दिला. तेवढ्यात दिवसभर आईसाठी घरी येणाऱ्या वासंती ताईंचा फोन आला. "हॅलो भाऊ, जेवणाचा डबा आला का? आजींना जेवण भरवण्याचं कसं कराल? त्यांना चपाती मिक्सरला लावून बारीक करून द्या. त्यात वरण नाहीतर दूध साखर कालवून छोट्या चमच्याने भरवा. मधून मधून पाणी प्यायला द्या. त्यांची औषधं मी त्या आठवड्याच्या खणवाल्या डब्यात लावून ठेवलीत. त्याप्रमाणे जेवल्यावर द्या." तिची सूचनांची सरबत्ती ऐकून हीपण सुवर्णाच्या तालमीत तयार झालेली दिसतेय असा विचार करत मी आपला मान हलवत हं, हो, मी करेन अशी मध्ये मध्ये उत्तरे देत होतो.

आता ठेवू फोन असे मी म्हणत असतानाच ती थोडं घुटमळंत म्हणाली ,"आणि ते म्हणजे त्याच काय आहे भाऊ, आजींचा अं तो हा तो डायपरपण बदलायला लागेल. त्यांना दिवसातून दोनदा आंघोळ घालावी लागेल. त्याचं हे करणं तुम्हाला कसं जमणार? मला घराबाहेर पडताच येत नाही. आता काय करूया. तुम्ही कसं कराल हे सगळं?" "मी करेन मॅनेज. इतकी वर्षे ती माझी आई होती आता मी तिचा बाबा होईन."मी म्हणालो.

मनाचा हिय्या केला. दुपारचे दुपारी पाहू. आधी तिला जेवायला घालू असा विचार करून मिक्सरचे भांडे शोधले. मिक्सर कसा लावायचा ते पाहिले. पोळी बारीक केली आईला वरणात भिजवलेली पोळी, थोडं दही भरवले. जेवण झाल्यावर तिला औषधे दिली. मी जेवून घेतले. पुन्हा भांडी विसळून ठेवली. थोडावेळ विश्रांती घेतली. चार साडेचारला आईच्या रूममध्ये गेलो तेव्हा ती जागच्या जागी चुळबूळ करत होती. तिचा डायपर बदलायला हवा हे मला जाणवले. मला खूप दडपण आले होते. मी तिला हळूहळू उठवून बाथरूममध्ये नेले. तिच्याशी सतत बोलत होतो. "आपले कपडे खराब झाले. आता ते बदलायला वासंतीपण नाही आणि सुवर्णापण नाही. आता आपले कपडे, डायपर कोण बदलणार? कशाला काळजी करायची आपला बाळू आहे ना तो काय आपला मुलगाच आहे. तो बदलणार आपले कपडे. आपण नाही का लहानपणी त्याची शी शू काढली! आता तो करणार. त्यात काही वाटून घ्यायचं नाही. तो आपल्याला छान न्हाऊमाखू घालेल. आपल्याला पावडर लावेल. आपण छान फ्रेश फ्रेश होणार."

मी तिच्याशी बोलत होतो की माझीच समजूत काढत होतो. देव जाणे... पण मी तिला स्वच्छ करताना, तिला आंघोळ घालताना, तिचे कपडे बदलताना तिला काय वाटत असेल असा विचार करून मी तिच्या नजरेला नजर भिडवू शकलो नाही. तिचे सारे आवरून, तिची चादर बदलून मी पुन्हा तिला झोपवले.

मी बोलायचा बंद झाल्याबरोब्बर आईचे पुटपुटणे सुरू झाले. ती काय बोलत होती हे ऐकण्याचा मी प्रयत्न करत होतो. नीट कान देऊन ऐकल्यावर कळले. ती म्हणत होती."आमचा बाळू शहाणा आहे. बाळू शहाणा मुलगा, शहाणा बाळू ". कॅसेट एकाच जागी अडकल्यासारखी ती तेच तेच बोलत होती. मी तिच्या जवळ बसलो. तिच्या हातावर हात ठेवला. तिने हलकेच माझ्या हातावर थोपटल्यासारखे केले. इतका वेळ मला तिला न्हाऊमाखू घालणारा, जेऊ घालणारा तिचा बाबा झाल्यासारखे वाटत होते, पण आता जाणवले की आईच उलट मला शाबासकी देऊन मला शहाणा मुलगा म्हणून माझी समजूत घालत होती. कोणत्याही अवस्थेत असली तरी ती आईच असते आणि काहीही केले तरी आपल्याला तिचा बाप कधीच बनता येणार नाही.

**–डॉ.समिधा ययाती गांधी,** पनवेल

# नैसर्गिक विधीसाठी गेलेल्यांचे आक्षेपार्ह चित्रीकरण

## किल्ले रायगडावर ड्रोनचा गैरवापर; गुन्हा दाखल करण्याची मागणी

**महाड : प्रतिनिधी**

दुर्गराज रायगडावरील शिवराज्याभिषेक सोहळ्यादरम्यान नैसर्गिक विधीसाठी गेलेल्या काही शिवभक्तांचे ड्रोनच्या साहाय्याने अनधिकृत चित्रीकरण करून ते समाजमाध्यमांवर प्रसारित केल्याप्रकरणी संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे करण्यात आली आहे. समिती अध्यक्ष फत्तेसिंह सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या संदर्भातील तक्रार महाड तालुका उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे यांच्यामार्फत दाखल करण्यात आली.



६ जूनला झालेल्या शिवराज्याभिषेक सोहळ्यास राज्यासह देशभरातून मोठ्या संख्येने शिवभक्त रायगडावर उपस्थित होते. रायगडावरील मर्यादित पायाभूत सुविधा आणि उपलब्ध स्वच्छतागृहांची अपुरी संख्या यामुळे काही शिवभक्तांना नाईलाजास्तव आडोशाला जाऊन नैसर्गिक विधी करावे लागल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. या परिस्थितीचा गैरफायदा घेत लौकिक गोळे यांनी ड्रोनच्या साहाय्याने संबंधित नागरिकांचे चित्रीकरण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर हे दृश्य समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात आल्याने संबंधितांच्या प्रतिष्ठेचा भंग झाल्याचा दावा करण्यात आल्याचे आणि या प्रकारामुळे लाखो शिवभक्तांच्या भावना दुखावल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

पवित्र शिवराज्याभिषेक सोहळा, दुर्गराज रायगड आणि शिवराज्याभिषेक महोत्सव समितीची जाणीवपूर्वक बदनामी करण्याच्या उद्देशाने हे कृत्य करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित व्यक्तीविरोधात भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

भारतीय न्याय संहितेतील कलम २९४, माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६ ई आणि कलम ६७ अंतर्गत कारवाईची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच नागरिकांच्या खासगी क्षणांचे चित्रीकरण करून त्यांचा सार्वजनिक अपमान केल्याने विनयभंगासंदर्भातील संबंधित कायदेशीर तरतुदींचाही विचार करण्यात यावा. या प्रकरणात वापरण्यात आलेल्या ड्रोनची मालकी, नोंदणी, परवानग्या आणि उड्डाणाची वैधता याची स्वतंत्र चौकशी करावी, तसेच व्हिडीओ तयार करणाऱ्या व प्रसारित करणाऱ्या सर्व व्यक्तींची ओळख पटवून त्यांच्याविरोधात कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

संबंधित व्हिडीओ समाजमाध्यमांवरून तातडीने हटविणे, डिजिटल पुरावे जप्त करून त्यांचे फॉरेन्सिक परीक्षण करणे आणि भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

दरम्यान, किल्ले रायगडावर शौचालयांची सुविधा असतानाही उघड्यावर शौच करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करणार का, असा प्रश्न नागरिकांतून होत आहे.

## जिल्ह्यात आज आंतरराष्ट्रीय योग दिन होणार साजरा

**अलिबाग :** शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक आरोग्य संवर्धनासाठी योगाचे महत्त्व लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला आहे. यानिमित्त क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम जिल्हा क्रीडा संकुल, नेहूली येथील प्रशस्त बॅडमिंटन हॉलमध्ये आयोजित करण्यात आला असून जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालय, जिल्हा युवा अधिकारी कार्यालय तसेच विविध योग संस्थांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन करण्यात आले आहे.

## अंजुमन इस्लाम शाळेत शैक्षणिक वर्षाची उत्साही सुरुवात



**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा प्राथमिक उर्दू शाळा, मुरुड जंजिरा येथे नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी डिजिटल क्लासरूमची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन आयटीआय मुरुडचे चेअरमन समीर झहीर दौनाक यांच्या हस्ते करण्यात आले. डिजिटल क्लासरूमसाठी तौसिफ इस्माईल फत्ते यांनी विशेष प्रयत्न केले असून त्यांच्या योगदानामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक सहाय्याने शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

कार्यक्रमात सचिव हिफझूररेहमान नझीरी, हायस्कूल चेअरमन अब्दुलरहीम कबले, मुख्याध्यापिका रक्षणदा खतीब, डिग्री कॉलेजचे प्राचार्य डॉ. साजिद शेख, हायस्कूल व जुनिअर कॉलेजचे प्राचार्य वसीम सातारेकर, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती. विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. नवीन वातावरण, डिजिटल सुविधा आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## ऑल इंडिया धनगर समाज महासंघाकडून शालेय विद्यार्थ्यांना मदतीचा हात

**नागोठणे : प्रतिनिधी**

वाढदिवस म्हणजे केवळ जल्लोष नव्हे, तर समाजाप्रति जबाबदारी पार पाडण्याची संधी आहे, याचे उत्तम उदाहरण ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे मुंबई प्रदेशाध्यक्ष संतोष पटकारे यांनी घालून दिले आहे. आपल्या वाढदिवसानिमित्त अनाठायी खर्च टाळत त्यांनी रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील जांभवली परिसरातील डोंगरदऱ्यात राहणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली.

कै. महादेव पटकारे प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या उपक्रमांतर्गत ३५ गरजू विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पेन व इतर शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यासाठी सुमारे २५ हजार रुपयांचा खर्च करण्यात आला.

यावेळी ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रवीण काकडे यांनी संतोष पटकारे यांच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, संतोष पटकारे दरवर्षी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ कै. महादेव पटकारे प्रतिष्ठानच्या माध्यमातून गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील असतात. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करणे समाजासाठी आदर्शवत उपक्रम आहे. याच उपक्रमांतर्गत कर्जत तालुक्यातील शेलू येथे रामचंद्र पुकळे व शिवाजीराव दातीर यांच्या निवासस्थानी आणखी ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.



## श्रीवर्धनमध्ये लवकरच मान्सूनच्या जोरदार सरी बरसण्याचा अंदाज



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

शुक्रवारी सायंकाळपासून श्रीवर्धन परिसरातील समुद्राचे पाणी बदलले आहे. समुद्र खवळायला सुरुवात झाली आहे. समुद्राच्या पाण्यातील वाळू वर येऊ लागते व पाण्याला एक प्रकारचा दुर्गंधीयुक्त वासदेखील येतो. अशी परिस्थिती मे अखेरीदरम्यान निर्माण झाली होती. त्यावेळी मान्सून कोकणात दाखल होण्याच्या तयारीत होता. परंतु नंतर मान्सूनचे वारे पश्चिम वायव्य दिशेकडून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे रखडल्यामुळे पुन्हा कडकडीत ऊन पडू लागले.

सायंकाळपासून समुद्र खवळायला पुन्हा सुरुवात झाली आहे. दुपारच्या वेळेस भरती असल्यामुळे समुद्राच्या उंच उंच लाटा धुप प्रतिबंधक बंधाऱ्यावरील दगडांवरती आपटत असल्याचे पाहायला मिळत होते. यावर्षी ज्येष्ठमास अधिक मास आल्यामुळे पहिला मृग नक्षत्राचा पाऊस होणार नाही, असा अंदाज काही पंचांगकर्त्यांनीदेखील वर्तविला होता. या प्रकाराला खंड असे म्हणतात. हा एक निसर्गचक्राचा भाग असून येत्या २२ तारखेला आर्द्रा नक्षत्र निघत असून आर्द्रा नक्षत्राच्या वेळी जोरदार पावसाला सुरुवात होईल, असा अंदाज पंचांगकर्त्यांनी वर्तवला आहे.

## वाढदिवसानिमित्त लांढर शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप; कष्टाच्या कमाईतून शिक्षणाला हातभार



**धाटाव : प्रतिनिधी**

वाढदिवसाचे औचित्य साधत समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा आदर्श लांढर येथे शनिवारी (दि. २०) राजिप शाळेत पाहायला मिळाला. दोस्ती ग्रुपच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी शाळेचे माजी विद्यार्थी सौरभ खेरटकर यांनी स्वतःच्या कष्टाच्या कमाईतून विद्यार्थ्यांसाठी वह्या व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत मातृशाळेप्रति असलेली आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी जपली.

रोहा प्रेस क्लबचे उपाध्यक्ष जितेंद्र जाधव, सुयोग जाधव, साहिल खेरटकर, रोहित जंगम, दैनिक पडवल तसेच सौरभ खेरटकर, शाळेचे शिक्षक दीपक पाटील, शिक्षिका वेदिका सोनकर तसेच शाळा कमिटी सदस्य रिद्धी पेटकर आदी उपस्थित होते. यावेळी वाढदिवसानिमित्त उपस्थित मान्यवरांचे अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना पत्रकार जितेंद्र जाधव म्हणाले की, वाढदिवस साजरा करण्याच्या अनेक पद्धती आहेत. मात्र, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे करून सौरभ खेरटकर यांनी समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. कंत्राटी कामगार म्हणून काम करत असताना स्वतःच्या कष्टाच्या कमाईतून विद्यार्थ्यांसाठी साहित्य देणे ही बाब कौतुकास्पद आहे. इतर माजी विद्यार्थ्यांनीही आपल्या मातृशाळेचे ऋण फेडण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पुढाकार घ्यावा.

यावेळी विद्यार्थ्यांना वह्या, शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. उपस्थितांनी सौरभ खेरटकर यांच्या कार्याचे कौतुक करीत अशा समाजोपयोगी उपक्रमांमधून वाढदिवस साजरा करण्याची संकल्पना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचावी, असे मत व्यक्त केले.

## मनोज जाधव यांना डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी पुरस्कार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुका कृषी कार्यालयातील कृषी सहाय्यक मनोज जाधव यांना यंदाचा महाराष्ट्र शासनाचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, नाविन्यपूर्ण प्रयोग, शेतकरी हितासाठी केलेले योगदान आणि लोकाभिमुख सेवाभावाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला असून येत्या १ जुलै कृषीदिनी निमित्ताने प्रदान करण्यात येणार आहे. सहायक कृषी अधिकारी मनोज सुमन मोहन जाधव सध्या राज्याचे फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांचे स्वीय सहायक म्हणून सेवारत आहेत.



पोलादपूर तालुक्यातील १३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवा काळात मनोज जाधव यांनी कृषी क्षेत्रात अनेक यशस्वी आणि मार्गदर्शक उपक्रम राबविले आहेत. पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी येथे जलकुंड उपचार आधारित फळबाग लागवडीचा अभिनव प्रयोग यशस्वी केला असून तो शासनाने स्वीकारला आहे. देवपूर येथे भात टोकण शेतीचा यशस्वी प्रयोग राबवून शेतकऱ्यांसाठी नवे मार्ग खुले केले. देवळे गावाने 'प्री वॉटर कप' स्पर्धेत रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. यामध्ये जाधव यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती तसेच जलसंधारण, मृदसंवर्धन आणि जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सलग चार वर्षे लोकाभिमुख कार्य करून ग्रामीण भागातील जलस्रोत विकासाला चालना दिली.यवतमाळ जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकरी कुटुंबांना मार्गदर्शन करत अंजनखेड, शारी आणि राणी धानोरा या गावांमध्ये शाश्वत व आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार केला. मनोज जाधव यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक शेतकऱ्यांनी आधुनिक शेती पद्धती स्वीकारून उत्पन्नवाढ साध्य केली.

आंबा घन लागवड, स्ट्रॉबेरी उत्पादन आणि आधुनिक बागायती व्यवस्थापन क्षेत्रात कृषी सल्लागार म्हणून त्यांनी राज्यभर ओळख निर्माण केली आहे. शेती शाळा, कृषी विस्तार कार्यक्रम, शेतकरी प्रशिक्षण शिबिरे आणि शासनाच्या विविध योजनांचा प्रसार यासंदर्भातदेखील त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



# गव्हाण ग्रामपंचायतीचा दिव्यांगांसाठी स्तुत्य उपक्रम

## पाच टक्के निधीतून ३० लाभार्थ्यांना आर्थिक मदत




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक बांधिलकी आणि सर्वसमावेशक विकासाचे उत्तम उदाहरण सादर करत गव्हाण ग्रामपंचायतीच्या वतीने दिव्यांगांसाठी असलेल्या पाच टक्के निधीमधून ग्रामपंचायत हद्दीतील ३० दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी १५ हजार तसेच दानशूर व्यक्तिमत्त्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून पाच हजार असा एकूण २० हजार रुपयांचा आर्थिक लाभ शुक्रवारी सुपूर्द करण्यात आला.

या निधीचे वितरण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, कामगार नेते महादेव घरत, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या निकिता घरकर, पनवेल पंचायत समिती सदस्य ज्ञानेश कोळी, विठेश भोईर, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, निलेश घरकर, रोशन भोईर, योगिता भगत, कामिनी कोळी, स्नेहलता ठाकूर, राजकिरण कोळी, किशोर कोळी, उषा देशमुख यांच्यासह पदाधिकारी, मान्यवर आणि दिव्यांग बांधव उपस्थित होते.

# सुगंधी शहर अभियानाला वाशी गावात खोडा

## विनापरवानगी खोदकामावर कारवाईची मागणी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत उपमहापौर दशरथ भगत यांनी सुरू केलेल्या 'स्वच्छ आंगण, सुगंधी शहर' या अभिनव संकल्पनेला वाशी गावातच खोडा घातला जात आहे. या संकल्पनेचा शुभारंभ वाशी गावातून करण्यात आला होता. महापौर सुजाता पाटील, सभागृह नेते सागर नाईक आणि आयुक्त कैलास शिंदे यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले होते. प्रत्येक नागरिकाने किमान आपल्या घरासमोरील परिसराची स्वच्छता राखावी, हा हेतू या संकल्पनेमागे होता.मात्र ज्या वाशी गावातून या उपक्रमाची सुरुवात झाली, त्याच वाशी गावात पालिकेची कोणतीही परवानगी न घेता एका नागरिकाने खोदकाम केले आहे.

वाशी विभागातील सेक्टर ३१, वाशी गावात सायन-पनवेल महामार्गालगतच्या भागात नवी मुंबई महापालिकेने केलेल्या विकासकामातील काँक्रीटची मार्गिका विनापरवानगी उखडण्यात आली आहे. त्याखाली चेंबर टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. याबाबत पालिकेची कोणतीही लेखी परवानगी मिळाली नसल्याची माहिती मिळत आहे. असे असताना थेट रस्ता खोदून पालिकेच्या मालमत्तेचे नुकसान केले गेले आहे. जागृत नागरिकांनी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यानंतर नगरसेवकाने अधिकाऱ्यांशी संपर्क साधून संबंधित नागरिकांवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. केंद्र शासनानेदेखील 'सुगंधी आंगण' संकल्पनेची दखल घेतली आहे. अशा वेळी पालिकेच्या शासकीय उपक्रमाला गालबोट लावणाऱ्यांवर पालिका कारवाई करणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# पनवेल आरटीओची मंगळवारी विशेष बैठक

## बुकिंग पोर्टलवरील शहरांची नवी नावे, नायलॉन मांजा बंदीवर होणार चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ऑनलाईन बुकिंग पोर्टल्सवर शहरांची नावे अद्ययावत करणे आणि प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या वाहतुकीवर बंदी या दोन महत्त्वाच्या विषयांवर कार्यवाही करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेलच्या वतीने मंगळवारी (दि. २३) विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक सकाळी ११ वाजता कॉन्फरन्स हॉल, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल व्हॅली शिल्प को-ऑप. हौ.सो. बिल्डिंग नं. एच-१, दुसरा मजला, सेक्टर ३६, खारघर नोड, ता. पनवेल येथे होणार आहे.

या बैठकीला पनवेल, उरण, खालापूर व कर्जत या तालुक्यातील सर्व वाहतूकदार, कुरियर प्रतिनिधी आणि बुकिंग एजन्सी धारकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरज पवार यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाने औरंगाबाद शहराचे "छत्रपती संभाजीनगर", उस्मानाबाद शहराचे "धाराशिव" व अहमदनगर शहराचे "अहिल्यानगर" असे नावात बदल केले आहेत. सर्व प्रवासी वाहतूकदार व बुकिंग एजन्सी यांनी त्यांच्या ऑनलाईन बुकिंग प्रणालीमध्ये ही नवीन नावे तातडीने अद्ययावत करणे बंधनकारक आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल सु-मोटो जनहित याचिका क्र. ०८/२०२० मधील आदेशानुसार नायलॉन सिंथेटिक मांजाच्या वाहतुकीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

स्थानिक वाहतूकदार व कुरियर एजन्सीज यांनी नायलॉन मांजाची वाहतूक करू नये याबाबत आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र शासनाच्या व उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार या बाबींवर तातडीने कार्यवाही करणे आवश्यक असून बैठकीत या दोन्ही विषयांवर सविस्तर चर्चा करून सूचना देण्यात येतील. तसेच आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा आढावाही घेतला जाणार आहे.

## रेल्वेच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील मोठे भिंगार गावाजवळ एका अनोळखी इसमाला तेथून जाणाऱ्या रेल्वेची धडक बसून झालेल्या दुर्घटनेत त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला असून त्याच्या नातेवाइकांचा शोध पनवेल तालुका पोलीस घेत आहेत. सदर अनोळखी इसमाचे वय अंदाजे ३५ वर्ष आहे. धावत्या रेल्वेची धडक बसल्याने त्याच्या शरीराचे दोन तुकडे झाले आहेत. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोउपनि. सरदार वसेकर यांच्याशी संपर्क साधावा.

# युईएस कॉलेज, विधी समितीकडून जागतिक योग दिन उत्साहात






**उरण : वार्ताहर**

२१ जून हा दिवस संपूर्ण देशात व जगभरात 'जागतिक योग दिवस' म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त यु.ई.एस. स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स आणि उरण तालुका विधी समिती व उरण बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २०) जागतिक योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला यु.ई.एस. संस्थेचे मानद सचिव राजेंद्र भानुशाली, खजिनदार अपूर्वा ठाकूर, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका तसेच इंचार्ज प्रिन्सिपल जज एस. एल. कुलकर्णी, सेकंड जॉइंट जज टंडन, उरण तालुका बार असोसिएशनचे व्हाईस प्रेसिडेंट योगेश म्हात्रे, व्हाईस प्रेसिडेंट फिमेल प्राची जोशी, संघश्री गायकवाड, रोहन घरत, निग्रेश पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

सर्वप्रथम स्कूल व कॉलेजच्या वतीने सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

त्यानंतर ज्यु. कॉलेजच्या शिक्षिकेने 'योगा' विषयीची संपूर्ण माहिती उपस्थितांना दिली. स्कूल व कॉलेजच्या क्रीडा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्राणायाम, मुद्रा, आसन, ध्यान आदी सर्व योगासने उपस्थित मान्यवर व स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्यु. कॉलेजच्या शिक्षिकेने केले. अशा रीतीने शरीर व मन सक्षम करून मनाला शांती देणारा जागतिक योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

# खारघरच्या एटीएममध्ये शिरली घोरपड

## सर्पमित्राने केले सुरक्षित रेस्क्यू



**नवी मुंबई : बातमीदार**

खारघर येथे कॅनरा बँकेच्या एटीएममध्ये घोरपड आढळल्याने एकच खळबळ उडाली. नागरिकांनी तातडीने पुनर्वसु फाउंडेशनला माहिती दिल्यानंतर सर्पमित्र अष्टविनायक मोरे घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी घोरपडीची सुखरूप सुटका केली. घटनेच्या वेळी एटीएमच्या बाहेर नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. घाबरलेली घोरपड एटीएमच्या एका कोपऱ्यात लपून बसली होती. सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांनी अत्यंत सावधगिरी बाळगत कोणतीही इजा न करता घोरपडीचे रेस्क्यू केले.

त्यानंतर तिची प्राथमिक तपासणी करून तिला नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडण्यात आले.या यशस्वी रेस्क्यू मोहिमेबद्दल स्थानिक नागरिकांनी सर्पमित्र अष्टविनायक मोरे तसेच पुनर्वसु फाउंडेशनचे आभार मानले. वेळेवर मिळालेल्या मदतीमुळे एका वन्यजीवाचा जीव वाचल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. पुनर्वसु फाउंडेशनने नागरिकांना आवाहन केले आहे की, परिसरात कोणताही वन्यजीव आढळल्यास त्याला इजा करण्याचा किंवा पकडण्याचा प्रयत्न करू नये. अशा वेळी तात्काळ सर्पमित्र किंवा वनविभागाशी संपर्क साधावा, जेणेकरून वन्यजीवांची सुरक्षित सुटका करून त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात परत सोडता येईल.

# दिवाळे कोळीवाड्यात मोबिलिटी कार्ड शिबिर

## एकाच कार्डवर आता मेट्रो-बस प्रवास



**नवी मुंबई : बातमीदार**

ज्येष्ठ नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अधिक सुलभता, सुरक्षितता आणि स्वावलंबन निर्माण करण्याच्या उद्देशाने ज्येष्ठ नागरिक संस्था, दिवाळे कोळीवाडा यांच्या वतीने ६५ वर्षांवरील पुरुष व महिला सदस्यांसाठी 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' मिळविण्यासाठी विशेष नोंदणी शिबिराचे आयोजन संस्थेच्या विरंगुळा केंद्रात करण्यात आले. या शिबिराला पंचक्रोशीतील ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

शिबिरात अनेक ज्येष्ठ नागरिक आपल्या मित्र-मैत्रिणींना भेटत होते, जुन्या आठवणींना उजाळा देत होते आणि नव्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी उत्साहाने नोंदणी करत होते. समाजाच्या उभारणीत आयुष्यभर योगदान देणाऱ्या या ज्येष्ठांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि आनंद प्रत्येकाला प्रेरणा देणारा ठरत होता. यावेळी विक्रांत पवार, प्रवीण राक्षे, ईशा राक्षे, संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी, गंगेश कोळी, सुरेश कोळी, महादेव कोळी, एकनाथ कोळी, शाम कोळी यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व अनेक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी संस्थेचे कौतुक केले.

ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा ओळखून त्यांच्यासाठी सातत्याने उपक्रम राबविणारी ही संस्था समाजासाठी आदर्श ठरत असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड हे आधुनिक डिजिटल सुविधांचे प्रतीक मानले जाते. या कार्डामुळे ज्येष्ठ नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिक सुलभ वापर करता येणार आहे. मेट्रो, बस आणि इतर वाहतूक सेवांमध्ये एकाच कार्डद्वारे व्यवहार करता येणार असून रोख रकमेची गरज कमी होत असल्याने प्रवास अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर झाला आहे. भविष्यात विविध डिजिटल सेवांमध्ये या कार्डचा उपयोग वाढणार असल्याने ज्येष्ठ नागरिकांना तंत्रज्ञानाशी जोडणारा हा एक महत्त्वाचा दुवा ठरणार आहे.

# सीवूडसमध्ये आज उत्पन्न दाखले वाटप शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना पुरस्कृत धर्मवीर संभाजी राजे चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सीवूडस येथील ह.भ.प. गोसावीबुवा कृष्णा तांडेल विद्यालय, करावे गाव येथे रविवारी (दि. २१) विविध उत्पन्न दाखले वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गरजू विद्यार्थी आणि नागरिकांना आवश्यक प्रमाणपत्रे एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे हा या शिबिराचा उद्देश आहे.

हे शिबिर सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत सुरू राहणार आहे. या शिबिरात वार्षिक उत्पन्न, जात प्रमाणपत्र, डोमिसाईल, नॉन-क्रिमीलेयर, ईडब्ल्यूएस आणि सेंट्रल ओबीसी यांसह विविध महत्त्वाचे दाखले नागरिकांना मिळणार आहेत. शालेय प्रवेश, शिष्यवृत्ती, नोकरी आणि इतर शासकीय योजनांसाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे विद्यार्थी व पालकांना वेळेत मिळावीत यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी आपली आवश्यक कागदपत्रे सोबत आणून शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिंदे गट शिवसेनेचे दत्ता घंगाळे यांनी केले आहे.

# साईनगरात पोलीस मदत केंद्राचे उद्घाटन

## उपायुक्त रश्मी नांदेडकर यांची उपस्थिती





**पनवेल : वार्ताहर**

साईनगर परिसरातील नागरिकांच्या मागणीनुसार आणि त्यांच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या नवीन पोलीस मदत केंद्राचे उद्घाटन परिमंडळ ३च्या पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. या मदत केंद्राचा लाभ विभागातील नागरिकांना होणार असून येथे पोलीस कर्मचारी कायमस्वरूपी कार्यरत राहणार आहेत. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, नगरसेवक लतिफ शेख यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी वर्ग आणि साईनगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"साईनगर परिसरातील नागरिकांच्या मागणीनुसार व सहकार्याने येथे नवीन पोलीस मदत केंद्र स्थापित करण्यात आले आहे. त्याचा फायदा परिसरातील नागरिकांना होणार आहे व या ठिकाणी पोलीस कार्यरत राहणार आहेत," असे प्रतिपादन पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर यांनी उद्घाटनप्रसंगी केले. हे पोलीस मदत केंद्र नगरसेवक लतिफ शेख यांच्या माध्यमातून उभारण्यात आले आहे. साईनगर परिसर नव्याने विस्तारत असल्याने कायदा-सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी पोलीस चौकीचा उपयोग होणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी यावेळी दिली.



# डेरवलीत दंगा काबू योजनेची रंगीत तालीम

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांच्या माध्यमातून तालुक्यातील डेरवली गाव येथे दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत कायदा-सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी पोलीस दलाच्या सज्जतेचा आढावा यावेळी घेण्यात आला.

सदरच्या दंगा काबू योजनेच्या रंगीत तालीममध्ये पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक कांबळे यांच्यासह तीन सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, २२ पोलीस अंमलदार, पीटर मोबाईल आणि पीटर मोबाईल तीन सहभागी झाले होते. तसेच उपजिल्हा रुग्णालय पनवेलकडील रुग्णवाहिका एक डॉक्टर व दोन कर्मचाऱ्यांसह उपस्थित होती. यावेळी दंगा काबू योजनेतील सर्व अधिकारी व अंमलदार यांना कवायतीचे प्रशिक्षण देण्यात आले. सद्यस्थितीच्या अनुषंगाने उपस्थित अधिकारी व अंमलदार यांना दंगलीमध्ये घ्यावयाच्या दक्षतेबाबत आवश्यक त्या सूचना वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांनी दिल्या.

# वाहतूक कोंडीतील रुग्णवाहिकेसाठी एमएसएफ जवानाने मोकळी केली वाट




**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल येथील एचडीएफसी सर्कलजवळील उड्डाणपूल परिसरात सायंकाळी ६.५८ वाजण्याच्या सुमारास निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीत अडकलेल्या रुग्णवाहिकेला महाराष्ट्र सुरक्षा बल कर्मचारी नितीन महांगडे यांनी प्रसंगावधान राखत मार्ग मोकळा करून दिला. त्यांच्या या तत्परतेमुळे रुग्णाला वेळेत उपचार मिळण्यास मदत झाली असून एका सजग नागरिकाने थेट मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

नवीन पनवेलमधील उड्डाणपूल परिसरात सायंकाळी मोठी वाहतूक कोंडी झाली होती. त्याच वेळी सायरन वाजवत एक रुग्णवाहिका आली, मात्र कोंडीमुळे तिला पुढे जाता येत नव्हते. हे लक्षात येताच महाराष्ट्र सुरक्षा बल कर्मचारी नितीन महांगडे (क्रमांक २५२६७७३) यांनी क्षणाचाही विलंब न करता पुढाकार घेतला. महांगडे यांनी स्वतः रस्त्यावर उतरून वाहतूक नियंत्रित केली आणि रुग्णवाहिकेला सुरक्षित व तात्काळ मार्ग उपलब्ध करून दिला. त्यांच्या या तत्परतेमुळे रुग्णवाहिका वेळेत पुढे जाऊ शकली व रुग्णाला आवश्यक वैद्यकीय उपचार वेळेत मिळण्यास मदत झाली. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत एका सजग नागरिकाने मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून नितीन महांगडे यांच्या उत्कृष्ट कार्याचे कौतुक केले आहे.

त्यांच्या या सेवाभावी व कर्तव्यदक्ष कार्याची नोंद प्रशासकीय स्तरावर तसेच त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी, अशी विनंतीही पत्राद्वारे करण्यात आली आहे. या घटनेबाबत पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी महांगडे यांचे विशेष कौतुक केले. वाहतूक शाखेच्या अंमलदारांसमवेत कार्यरत असलेले जवान अत्यंत सजगपणे, शिस्तबद्ध पद्धतीने व जबाबदारीची जाणीव ठेवून कर्तव्य बजावत असल्याचे त्यांनी सांगितले. आपत्कालीन परिस्थितीत दाखवलेली तत्परता आणि कर्तव्यनिष्ठा ही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# माणगावचे काळ नदीपात्र पडले कोरडे

## १०० गावांवर भीषण संकट; नागरिक, शेतकऱ्यांसह जनावरेही हवालदिल

**माणगाव : प्रतिनीधी**

माणगाव तालुक्याची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी काळ नदी आज अक्षरशः कोरडी पडली आहे. सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यांतून उगम पावणाऱ्या या नदीच्या पात्रात पिण्याच्या पाण्याचा खडखडाट झाला असून नदीचे विस्तीर्ण पात्र उघडे-बोडके दिसत आहे. ज्या नदीच्या पाण्यावर हजारो कुटुंबांचे जीवन अवलंबून आहे, त्याच नदीचा श्वास थांबल्याचे विदारक चित्र सध्या पाहायला मिळत आहे. त्यामुळे निजामपूर, माणगाव, गोरेगाव, इंदापूर, लोणेरे यांसह सुमारे १०० गावांवर भीषण पाणीटंचाईचे संकट घोंघावत असून नागरिकांच्या चिंतेत दिवसेंदिवस भर पडत आहे.



एकेकाळी बारमाही वाहणारी काळ नदी आज पूर्णपणे आटल्याने परिसरातील नागरिक, शेतकरी आणि पशुपालक हवालदिल झाले आहेत. नदीच्या पात्रात पाण्याचा थेंबही शिल्लक नसल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. येत्या काही दिवसांत समाधानकारक पाऊस झाला नाही, तर परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

माणगाव तालुक्यातील काळ आणि गोद या प्रमुख नद्यांचे पात्र पाण्याअभावी उघडे पडले आहे. त्याचबरोबर छोट्या-मोठ्या धरणांमधील जलसाठा संपत आला आहे. विहिरी, तलाव, ओढे, नाले आणि पारंपरिक जलस्रोतांनी तळ गाठला असून अनेक ठिकाणी पाण्याचा थेंबही दिसत नाही. उन्हाच्या तीव्र झळांमुळे जमिनीला भेगा पडल्या आहेत, तर जलस्रोतांची अवस्था पाहून ग्रामस्थांच्या डोळ्यांत चिंतेचे अश्रू दाटून येत आहेत.

पाणीटंचाईची सर्वाधिक झळ सुमारे ३० हजार लोकसंख्या असलेल्या माणगाव शहराला बसण्याची शक्यता आहे. माणगाव शहरासह निजामपूर, इंदापूर, गोरेगाव, लोणेरे आणि आसपासच्या गावांतील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या संघर्षाला सामोरे जावे लागू शकते. ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये आधीच पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले असून प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

काही दुर्गम खेड्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असला, तरी तो अपुरा ठरत आहे. गावोगावी महिला, वृद्ध आणि लहान मुले पाण्याच्या हंड्यांसाठी वणवण भटकताना दिसत आहेत. ग्रामस्थ चातक पक्ष्यासारखी आकाशाकडे नजर लावून पावसाची वाट पाहत आहेत.

कडक उन्हामुळे शेतातील पिके करपून गेली आहेत. जनावरांसाठी चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक विहिरी कोरड्या पडल्या असून तलावांमध्ये चिखलही उरलेला नाही. ओढे-नाले सुकल्याने ग्रामीण भागातील जीवनमान विस्कळीत झाले आहे.

अशा बिकट परिस्थितीत काळ प्रकल्पातून कालव्याद्वारे सोडण्यात आलेले पाणी काही प्रमाणात आधार ठरत आहे. हे पाणी प्रामुख्याने जनावरांसाठी, चाऱ्यासाठी आणि शेतीच्या गरजांसाठी वापरले जात आहे. काही गावांमध्ये नागरिक पिण्यासाठीही याच पाण्यावर अवलंबून असल्याचे चित्र आहे. त्यामुळे संकट पूर्णपणे टळले नसले, तरी काही अंशी दिलासा मिळाला आहे.

माणगाव शहराला दररोज लाखो लिटर पाण्याची आवश्यकता असते. मात्र शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या नदीकाठच्या पाणी उपसा विहिरीदेखील आता आटण्याच्या स्थितीत पोहोचल्या आहेत. या विहिरींमधील गाळ तातडीने काढून साफसफाई न केल्यास पाणीपुरवठा यंत्रणा धोक्यात येण्याची शक्यता आहे.

परिस्थितीवर वेळीच उपाययोजना न झाल्यास शहरात एक किंवा दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची वेळ येऊ शकते, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

काळ नदीच्या आटलेल्या पात्राने संपूर्ण तालुक्याला धोक्याचा इशारा दिला आहे. प्रत्येक नागरिकाने पाण्याचा जपून वापर करणे, पाणी वाया जाणार नाही याची काळजी घेणे आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांना प्राधान्य देणे ही काळाची गरज बनली आहे. प्रशासनानेही तातडीने जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, गाळ काढणे, टँकर व्यवस्था आणि पर्यायी पाणी पुरवठ्याच्या उपाययोजना राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. काळ नदी कोरडी पडणे ही केवळ नैसर्गिक घटना नाही, तर हजारो कुटुंबांच्या जीवनाशी निगडित असलेली गंभीर शोकांतिका आहे. आता सर्वांच्या नजरा आकाशाकडे लागल्या असून पावसाचा प्रत्येक थेंब जीवनदान ठरणार आहे.

## लव्हेज येथे भवानी मातेच्या मंदिराचा भूमिपूजन सोहळा

**खोपोली : प्रतिनीधी**

खोपोली नगरपालिका हद्दीतील लव्हेज गावातील भवानी माता मंदिराचे नूतनीकरण करण्यात येणार आहे या निमित्ताने शुक्रवारी ग्रामस्थांतर्फे भूमिपूजनाचा सोहळा विधीवत संपन्न झाला.

या सोहळ्याला नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, पोलीस निरीक्षक सचिन हिरे, स्थानिक नगरसेवक नरेश पालांडे, निओणी कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर शिवम यांच्यासह गावातील सर्व ज्येष्ठ ग्रामस्थ महिला व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावची देवी भवानी माता यांचे निसर्गरम्य वातावरण मंदिर असून पावसाळी या भागाचा निसर्गाचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. नूतन मंदिराचा भूमिपूजन सोहळ्यानंतर या भागाचं सौंदर्य आणखीनच खुलून दिसणार आहे, असे यावेळी ग्रामस्थांतर्फे सांगण्यात आले.



वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

# नागोठणे कॅन्सरमुक्त करणार! लायन्स क्लबचे नवनिर्वाचित अध्यक्ष विलास चौलकर यांचा निर्धार

**नागोठणे : बातमीदार**

समाजसेवा, आरोग्य जनजागृती आणि लोककल्याणासाठी सदैव अग्रस्थानी असलेल्या लायन्स क्लबच्या माध्यमातून नागोठणे विभागात अधिक व्यापक सामाजिक कार्य राबविण्याचा संकल्प नागोठणे लायन्स क्लबचे नवनिर्वाचित अध्यक्ष ला. विलास चौलकर यांनी व्यक्त केला. "नागोठणे विभागात एकही कॅन्सर रुग्ण आढळू नये यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असून नागोठणे कॅन्सरमुक्त करण्याचा माझा निर्धार आहे," असे प्रतिपादन त्यांनी शपथग्रहण समारंभात केले.

लायन्स क्लबचे अध्यक्ष ला. सखाराम ताडकर व त्यांच्या सहकाऱ्यांचा एक वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर नूतन कार्यकारिणीचा शपथग्रहण समारंभ शुक्रवार, दि. १९ जून रोजी सायंकाळी ७ वाजता नागोठणे येथील हॉटेल गुलमोहरच्या सभागृहात कौटुंबिक व उत्साही वातावरणात पार पडला.

यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून विलास चौलकर, उपाध्यक्ष सुधाकर जवके, सेकंड उपाध्यक्ष विनोद सावंत, सचिव डॉ. अनिल गिते, सहसचिव विजय शहासने, खजिनदार दीपक गायकवाड तसेच उपखजिनदार विद्या म्हात्रे यांनी पदाची शपथ घेतली.

कार्यक्रमात बोलताना विलास चौलकर म्हणाले की, सरपंच म्हणून तसेच श्री अष्टविनायक पतसंस्थेच्या माध्यमातून लोकसेवा करण्याची संधी मिळाली. आता लायन्स क्लबच्या माध्यमातून अधिक व्यापक समाजकार्य करण्याची संधी मिळाली आहे. सभासद संख्या वाढविणे, महिलांचा सहभाग वाढविणे आणि विविध सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबविणे यावर विशेष भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शपथग्रहण सोहळ्यास पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मुकेश तनेजा, जीएसटी को-ऑर्डिनेटर अनिल म्हात्रे, रिजन चेअरपर्सन विद्या अधिकारी, झोन चेअरपर्सन मंजुषा कुद्रीमोती, रायगड जिल्हा परिषदेचे निवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी शरद वाडेकर, गवळी समाज जिल्हाध्यक्ष राजेश मेहतर, नागोठणे लायन्स क्लब अध्यक्ष विलास चौलकर, माजी अध्यक्ष सखाराम ताडकर,एमजेएफ सुधाकर जवके, यशवंत चित्रे, विवेक सुभेकर, प्रकाश जैन आदी उपस्थित होते.



## योगाने घडवा निरोगी आणि आनंदी जीवन

आजच्या संगणकीय, स्पर्धात्मक आणि वेगवान जीवनशैलीत प्रत्येक व्यक्ती करिअर, पैसा आणि यशाच्या मागे धावत आहे. या सततच्या धावपळीमुळे शारीरिक व मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून तणाव, चिंता आणि विविध आजारांचे प्रमाण वाढत आहे. भौतिक सुखसुविधांच्या मागे धावताना अनेकजण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहेत, पण निरोगी जीवनाचे महत्त्व आता अधिकाधिक लोकांच्या लक्षात येऊ लागले आहे. त्यामुळे व्यायामासोबतच योगसाधनेकडेही लोकांचा कल वाढत आहे. देश-विदेशातील तरुणांमध्ये योगाबद्दल विशेष आकर्षण निर्माण झाले असून भारतातही नियमित योगाभ्यास करणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे.





पतंजली मुनींच्या काळापासून योगा भारतात रूजत आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन दरवर्षी २१ जून रोजी जगभरात साजरा केला जातो. योग ही भारताची प्राचीन आणि अमूल्य परंपरा आहे. योगामुळे शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधला जातो. निरोगी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. योग ही केवळ व्यायामपद्धती नसून जीवन जगण्याची एक कला आहे. नियमित योगाभ्यासामुळे शरीर सुदृढ राहते, मन शांत राहते आणि एकाग्रता वाढते. तसेच तणाव, चिंता आणि विविध आजारांपासून दूर राहण्यास मदत होते.

२७ सप्टेंबर २०१४ रोजी भारताने संयुक्त राष्ट्रसंघासमोर आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. त्यानंतर ११ डिसेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने हा प्रस्ताव मंजूर केला आणि २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. आज आपण सर्वजण १२वा आंतराष्ट्रीय योग दिन साजरा करत आहोत.

यंदाच्या २०२६च्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची थीम "Yoga for Healthy Ageing" (निरोगी वृद्धत्वासाठी योग) अशी आहे. वाढत्या वयातही निरोगी, सक्रिय आणि आनंदी जीवन जगण्यासाठी योग किती महत्त्वाचा आहे, याची जाणीव करून देणे हा या थीममागील उद्देश आहे. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरूस्ती टिकून राहते, मानसिक स्वास्थ्य सुधारते आणि जीवनाची गुणवत्ता उंचावते. त्यामुळे लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकाने योग आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवावा, असा संदेश या थीमद्वारे दिला जात आहे.

योगाचे फायदे : शरीर लवचिक व सुदृढ बनते, तणाव, चिंता आणि नैराश्य कमी होते, मन शांत व एकाग्र राहते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते, हृदयविकार, मधुमेह आणि स्थूलता यांसारख्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते, सकारात्मक विचारसरणी विकसित होते. योगाचे सर्वात महत्त्वाचे फायदे वजनात घट, सशक्त आणि लवचिक शरीर, तजेलदार त्वचा, शांत आणि प्रसन्न मन उत्तम आरोग्य यातली जी गोष्ट तुम्हाला हवी असते ती द्यायला योगा समर्थ आहे.

योग हे मनुष्याच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी एक प्रभावी साधन आहे. रोगमुक्त, तणावमुक्त आणि व्यसनमुक्त जीवन जगण्यासाठी तसेच आयुष्यात सुख, समृद्धी आणि शांतता मिळवण्यासाठी दररोज थोडा वेळ योगासाठी देणे आवश्यक आहे. नियमित योगाभ्यासामुळे शरीर निरोगी राहते, मन प्रसन्न राहते आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो. योग ही मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य जपण्याची एक प्राचीन आणि उपयुक्त पद्धत आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात निरोगी शरीर, शांत मन आणि संतुलित जीवनशैलीसाठी योगाचे महत्त्व अधिक वाढले आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करून निरोगी आणि आनंदी जीवनाकडे वाटचाल करावी.

**-एच.एन. पाटील, उपशिक्षक**
**तु.ह.वाजेकर विद्यालय, फुंडे-उरण**

## एसएसओएसपी कॉलेजचे सुयश

**नागोठणे** : महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून नागोठणे येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या एसएसओएसपी डिप्लोमा इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९१.७२ टक्के लागला.

या परीक्षेत कॉम्प्युटर विभागातील श्रावणी संतोष बामणे हिने ९४.७१ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाचा निकाल ७६.२५ टक्के लागला. इलेक्ट्रिकल विभागाचा १०० टक्के, कॉम्प्युटर विभाग १०० टक्के, आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड मशीन लर्निंग विभाग १०० टक्के, मेकॅनिकल विभाग ९७.६० टक्के, तर सिव्हिल विभागाचा निकाल ७६.४७ टक्के लागला आहे.

## दहिवलीत शेतकऱ्यांना यांत्रिक भातलागवड प्रशिक्षण

**माणगाव : प्रतिनिधी**

बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेती अधिक उत्पादनक्षम, किफायतशीर आणि आधुनिक बनविण्यासाठी कृषी यांत्रिकीकरणाचा स्वीकार करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन माणगाव तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर यांनी केले. मजुरांची वाढती टंचाई लक्षात घेता यांत्रिक भात लागवड पद्धतीचा अवलंब करण्यासाठी शेतकऱ्यांनी प्लास्टिक ट्रेवर रोपवाटिका तयार करण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.



माणगाव तालुका कृषी अधिकारी कार्यालय अंतर्गत कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा यांच्या वतीने खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर दहिवली येथे प्रगतशील शेतकरी दाऊद गालसुरकर यांच्या प्रक्षेत्रावर किसान गोष्टी चर्चासत्र व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला परिसरातील शेतकऱ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

कार्यक्रमासाठी कृषी संशोधन केंद्र रेपोलीचे प्रभारी अधिकारी डॉ. निगडे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती, हवामान बदलाचा शेतीवर होणारा परिणाम आणि त्यावरील उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्रगतशील शेतकरी दाऊद गालसुरकर यांनी कृषी यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून भात लागवडीसाठी प्लास्टिक ट्रेवर रोपवाटिका तयार करण्याची पद्धत, जमिनीची मशागत, यांत्रिक लावणीची तयारी आणि त्यातून होणारे फायदे याबाबत स्वतःचे अनुभव उपस्थितांशी शेअर केले. तसेच ट्रेमध्ये रोपवाटिका तयार करण्याचे थेट प्रात्यक्षिक सादर करून शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे निरसन केले. माणगाव तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर यांनी आपल्या मार्गदर्शनात खरीप हंगामाचे नियोजन करताना शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवण क्षमता तपासून घ्यावी तसेच बीज प्रक्रिया करणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. अधिक उत्पादनासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय यंदा 'एल निनो'च्या संभाव्य प्रभावाचा विचार करून कृषी विभागाने सुचविलेल्या शिफारशी व उपाययोजनांचा अवलंब करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

'आत्मा'चे सहाय्य तंत्रज्ञान व्यवस्थापक प्रमोद शिंदे यांनी 'खेत बचाव अभियान' विषयी माहिती देताना जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. सहाय्यक कृषी अधिकारी प्रतिभा खिल्लारी यांनी कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली.

## माणगाव उपजिल्हा रुग्णालयाला समाजोपयोगी भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी जपत आणि वाढदिवसाचे औचित्य समाजसेवेशी जोडत संतोष सीताराम खाडे यांच्या वाढदिवसानिमित्त खाडे परिवाराने माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील प्रस्तुतीगृह (डिलिव्हरी विभाग) येथे नवीन प्रवेशद्वार उभारून एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे. या कामासाठी खाडे परिवारासोबत जितेंद्र लक्ष्मण भोनकर यांचेही मोलाचे योगदान लाभले.



उपजिल्हा रुग्णालयातील प्रस्तुतीगृहाच्या प्रवेशद्वाराची अवस्था अनेक दिवसांपासून जीर्ण झाली होती. तुटलेल्या प्रवेशद्वारामुळे रुग्ण, गर्भवती महिला तसेच त्यांच्या नातेवाईकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत होता. याबाबत रुग्णालयातील गवळी मॅडम यांनी संतोष खाडे यांचे लक्ष वेधले होते. तसेच रुग्णालय प्रशासनानेही या आवश्यक कामासाठी मदतीची अपेक्षा व्यक्त केली होती.

या मागणीची तत्काळ दखल घेत श्री. संतोष खाडे यांनी कोणतीही प्रसिद्धी किंवा अपेक्षा न ठेवता प्रवेशद्वार उभारण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या पुढाकारातून आणि खाडे परिवाराच्या सहकार्याने हे काम पूर्णत्वास गेले. त्यामुळे आता प्रस्तुतीगृहात येणाऱ्या महिलांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना अधिक सुरक्षित व सुसज्ज सुविधा उपलब्ध होणार आहेत.

विशेष म्हणजे, उपजिल्हा रुग्णालयाच्या गरजांसाठी संतोष खाडे यांनी यापूर्वीही अनेक वेळा मदतीचा हात पुढे केला आहे. औषधे, गोळ्या, इंजेक्शन, चष्मे, सलाईन, बाके (बेंचेस), पंखे तसेच इतर आवश्यक साहित्य स्वतःच्या माध्यमातून किंवा इतर दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने रुग्णालयाला मोफत उपलब्ध करून देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. त्यामुळे रुग्णालयाच्या सुविधा वृद्धिंगत होण्यास हातभार लागत असून अनेक रुग्णांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळत आहे.

यावेळी बोलताना संतोष खाडे यांनी समाजातील दानशूर व्यक्तींनीही सार्वजनिक आरोग्य संस्थांच्या गरजा ओळखून पुढे यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. शासनाच्या प्रयत्नांसोबतच समाजातील सुजाण नागरिक, उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी योगदान दिल्यास रुग्णालयांमधील अनेक उणिवा दूर होऊ शकतात, असे त्यांनी सांगितले.

वाढदिवस साजरा करण्याच्या पारंपरिक पद्धतींपेक्षा समाजहिताचे कार्य करून तो संस्मरणीय करण्याचा खाडे परिवाराचा हा उपक्रम नागरिकांमध्ये कौतुकाचा विषय ठरत आहे. त्यांच्या या सामाजिक जाणिवेतून इतरांनीही प्रेरणा घेऊन सार्वजनिक संस्थांच्या विकासासाठी योगदान द्यावे, अशी भावना यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

# भारतीय महिला हॉकी संघाची घोडदौड

## चिलीला हरवत नेशन्स कप स्पर्धेच्या अंतिम फेरीत

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

भारतीय महिला हॉकी संघाने ऑकलंड येथे झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात चिलीला पराभूत करून एफआयएच हॉकी महिला नेशन्स कप स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. या सामन्यात भारतीय संघाने चिलीवर ६–० असा एकतर्फी विजय मिळवला.

उपांत्य फेरीच्या सामन्यात भारतीय संघाने सुरुवातीपासूनच चिलीवर दबाव टाकला आणि त्यांना पुनरागमन करू दिले नाही. संघाला सहाव्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळाला. याचा फायदा घेत नवनीतने गोल करून भारताला १–० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर १३व्या मिनिटाला नवनीतने पुन्हा गोल केला. १४व्या मिनिटाला ड्रॅगफ्लिकर दीपिकाने पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर करून भारताची आघाडी आणखी वाढवली आणि १८व्या मिनिटाला तिने पुन्हा एकदा गोल करून स्कोअर ४–० असा केला.



भारतासाठी नेहा आणि रितुजा यांनीही गोल केले.

कर्णधार सलीमा टेटेला तिच्या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीबद्दल सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारताच्या दीपिकाने या सामन्यात दोन गोल केले असून ती स्पर्धेतील सर्वाधिक गोल करणारी खेळाडू ठरली. भारतीय संघाचा अंतिम सामना अमेरिका किंवा न्यूझीलंड यांच्यापैकी एका संघाविरुद्ध होऊ शकतो.

न्यूझीलंडमधील ऑकलंड येथे झालेल्या एफआयएच हॉकी महिला नेशन्स कप स्पर्धेत कर्णधार सलिमा टेटेच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला हॉकी संघाने अजिंक्य राहून अंतिम फेरीत धडक मारली आहे. भारतीय संघाने 'पूल ए' मध्ये अमेरिकेचा ३–२, जपानचा २–१ आणि उरुग्वेचा ३–२ असा पराभव करून साखळी फेरीत अव्वल स्थान पटकावले आणि त्यानंतर उपांत्य फेरीत चिलीचा ६–० असा धुव्वा उडवला.

संपूर्ण स्पर्धेत चार सलग सामने जिंकत भारताने एकूण १४ गोल केले, तर केवळ पाच गोल स्वीकारले. भारतीय महिला संघ या स्पर्धेत एकही सामना हरलेला नाही. त्यामुळे अंतिम फेरीत त्यांचा विजयाची शक्यता जास्त आहे.

# सायबारीचा विक्रमी ७१ सेकंदांत गोल

## मोरोक्कोची स्कॉटलंडवर मात

**बोस्टन : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेत मोरोक्कोने शानदार कामगिरी करत स्कॉटलंडचा १–० असा पराभव केला. या विजयासह मोरोक्कोने स्पर्धेतील पहिला विजय मिळवत बाद फेरीच्या दिशेने मोठे पाऊल टाकले आहे. सामन्याचा नायक ठरला तो इस्माईल सायबारी, ज्याने अवघ्या ७१ सेकंदांत गोल करत स्कॉटलंडला सुरुवातीलाच धक्का दिला.

सामना सुरू झाल्यानंतर पहिल्याच मिनिटात इस्माईल सायबारीने मिळालेल्या संधीचे सोने करत चेंडू जाळ्यात धाडला. त्याचा हा गोल विश्वचषक २०२६मधील आतापर्यंतचा सर्वात वेगवान गोल ठरला आहे. विशेष म्हणजे सायबारीने मागील सामन्यात ब्राझीलविरुद्धही गोल केला होता. सलग दुसऱ्या सामन्यात त्याने निर्णायक भूमिका बजावली.



गोलनंतर मोरोक्कोने सामन्यावर पकड कायम ठेवली. संघाने सातत्याने आक्रमण करत अनेक संधी निर्माण केल्या. पहिल्या सत्रात बिलाल एल खानौसला आघाडी दुप्पट करण्याची संधी मिळाली होती, मात्र त्याला गोल करता आला नाही. दुसऱ्या सत्रातही मोरोक्कोचा दबाव कायम राहिला. ५०व्या मिनिटाला सायबारीचा आणखी एक दमदार फटका थेट क्रॉसबारला जाऊन आदळला. त्यानंतर स्कॉटलंडचा गोलरक्षक अँगस गनने काही उत्कृष्ट बचाव करत संघाला मोठ्या पराभवापासून वाचवले.


संपूर्ण सामन्यात स्कॉटलंडच्या आक्रमणात धार दिसली नाही. मोरोक्कोचा अनुभवी गोलरक्षक यासिन बोनूला फारशा कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले नाही. अखेरच्या टप्प्यात रायन क्रिस्टी व स्कॉट मॅकटोमिने यांनी बरोबरी साधण्याचा प्रयत्न केला, मात्र मोरोक्कोच्या भक्कम बचावासमोर त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरले.

# हार्दिक पांड्या इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेतूनही बाहेर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या इंग्लंडविरुद्धच्या आगामी वनडे मालिकेतून बाहेर पडला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार हार्दिकला वनडे क्रिकेटसाठी पूर्णपणे तंदुरुस्त होण्यास आणखी थोडा वेळ हवा आहे. त्यामुळे तो इंग्लंडविरुद्धच्या निवडीसाठी उपलब्ध नाही.

इंग्लंडविरुद्धच्या आगामी वनडे मालिकेसाठी हार्दिक पांड्या आवश्यक फिटनेस पातळी गाठण्यात अपयशी ठरल्याने त्याला संघातून वगळण्यात आले आहे. आयपीएल २०२६मध्ये मुंबई इंडियन्सचे प्रतिनिधित्व करताना हार्दिकच्या पाठीचे स्नायू दुखावले गेले होते. दुखापतीतून सावरताना



त्याने अलीकडेच बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये तंदुरूस्तीची चाचणी दिली होती. सरावादरम्यान त्याने १० षटकांचा कोटाही पूर्ण केला, ज्यामुळे त्याच्या पुनरागमनाच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या, परंतु पुनर्वसन प्रक्रियेदरम्यान या ऑलराउंडरला आणखी एक झटका बसला. या महिन्याच्या सुरुवातीला क्वाड्रिसेप्सच्या (मांडीचे स्नायू) नवीन दुखापतीमुळे हार्दिकला अफगाणिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतूनही बाहेर व्हावे लागले होते. फिटनेस चाचणीदरम्यान गोलंदाजीचा वर्कलोड वाढल्यामुळेच ही दुखापत झाली असावी, असा अंदाज वर्तवला जात आहे.

### कोणाला संधी मिळणार?

आता इंग्लंड दौऱ्यात हार्दिकच्या अनुपस्थितीत टीम इंडियाचा अष्टपैलू खेळाडूंचा शोध सुरूच आहे. सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोशेट यांनी नुकतेच नितीश कुमार रेड्डीचा हार्दिकचा दीर्घकालीन उत्तराधिकारी आणि बॅकअप म्हणून उल्लेख केला आहे. २०२७च्या वर्ल्डकपच्या दृष्टीने संघ व्यवस्थापन या तरुण खेळाडूच्या कामगिरीवर लक्ष ठेवून आहे.

# रोहित शर्माची झेलची हॅट्ट्रिक!

**चेन्नई : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यात भारताच्या रोहित शर्माने प्रसिध कृष्णाच्या गोलंदाजीवर लागोपाठ तीन झेल घेत एक खास रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. यासह रोहित हा एकाच गोलंदाजाच्या गोलंदाजीवर तीन झेल घेणारा तिसरा भारतीय ठरला आहे.

याआधी वनडे क्रिकेटमध्ये एकाच गोलंदाजाच्या गोलंदाजीवर तीन झेल घेण्याचा रेकॉर्ड हा माजी भारतीय खेळाडू व्हीव्हीएस लक्ष्मण आणि शिखर धवनच्या नावावर आहे. लक्ष्मणने २००४मध्ये इरफान पठाणच्या गोलंदाजीवर लागोपाठ तीन झेल घेऊन हा कारनामा केला होता. त्यानंतर २०१८मध्ये धवनने जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीवर तीन झेल घेऊन हा रेकॉर्ड केला होता. आता २०२६मध्ये रोहितने हा कारनामा केला आहे.


# यजमान अमेरिका सलग दुसऱ्या विजयासह पुढील फेरीत

**सिएटल : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषकाच्या गट 'ड'मधील आपली दमदार कामगिरी कायम राखत यजमान अमेरिकेने ऑस्ट्रेलियाचा २–० असा पराभव केला. या शानदार विजयासह अमेरिकन संघाने स्पर्धेच्या पुढील टप्प्यात म्हणजेच 'राऊंड ऑफ ३२'मध्ये आपले स्थान निश्चित केले आहे.

सिएटल स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या रोमांचक सामन्यात अमेरिकन खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा दाखवला. त्यांनी केवळ पहिल्या हाफमध्येच दोन गोल करत प्रतिस्पर्ध्यांवर पूर्ण वर्चस्व प्रस्थापित केले. यजमान देश मेक्सिकोनंतर फिफा विश्वचषक २०२६च्या बाद फेरीत स्थान निश्चित करणारा अमेरिका हा दुसरा संघ ठरला आहे.

ऑस्ट्रेलियावर २–० असा सहज विजय मिळवत अमेरिकेने पुढील फेरीचे तिकीट मिळवले. मॉरिसिओ पोचेटिनो यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या अमेरिकेने सलग दुसरा विजय नोंदवत गटातील एक सामना बाकी असतानाच बाद फेरीत प्रवेश केला. विशेष म्हणजे १९२९नंतर प्रथमच अमेरिकेला विश्वचषकात सलग दोन सामने जिंकण्याचा पराक्रम करता आला आहे.



सामन्याच्या सुरुवातीपासूनच अमेरिकेने ऑस्ट्रेलियावर दबाव टाकण्यास सुरुवात केली. ११व्या मिनिटाला त्यांनी आपला पहिला गोल केला. अमेरिकन खेळाडू फोलारिन बालोगुनने जमिनीलगतचा 'क्रॉस' (पास) दिला, तो चेंडू अडवण्याच्या आणि दूर करण्याच्या प्रयत्नात ऑस्ट्रेलियन बचावपटू कॅमेरॉन बर्जेसकडून एक महागडी चूक झाली आणि चेंडू थेट त्याच्याच संघाच्या गोलजाळीत गेला. या 'ओन गोल'मुळे (स्वतःच्याच गोलजाळीत केलेल्या गोलमुळे) अमेरिकेला १–० अशी सुरुवातीची आघाडी मिळाली आणि ऑस्ट्रेलियन संघावर मोठा दबाव निर्माण झाला.

पहिल्या हाफ संपण्यापूर्वीच अमेरिकेने आपली आघाडी दुप्पट केली. ४३व्या मिनिटाला सर्जिनो डेस्टने गोल करण्याचा एक उत्तम प्रयत्न केला. या संधीचा पुरेपूर फायदा घेत अॅलेक्स फ्रीमनने पेनल्टी एरियाच्या आतून एक उत्कृष्ट 'हेडर' लगावला आणि चेंडू थेट जाळीत धाडला. या गोलची 'व्हीएआर'द्वारे थोडक्यात पडताळणी करण्यात आली, परंतु अखेरीस पंचांनी तो निर्णय कायम ठेवला. परिणामी अमेरिका २–० अशा आघाडीसह हाफ टाईम झाला.

पिछाडीवर पडल्यानंतर ऑस्ट्रेलियन संघाने दुसऱ्या सत्रात सामन्यात पुनरागमन करण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. त्यांच्या खेळाडूंनी अमेरिकेच्या बाजूच्या मैदानावर अनेक आश्वासक आक्रमणे केली, परंतु अमेरिकेची भक्कम बचावफळी भेदणे अशक्य ठरले. अमेरिकन खेळाडूंनी सामन्याच्या शेवटच्या मिनिटापर्यंत आपली आघाडी कायम राखली आणि ऑस्ट्रेलियाला गोल करण्याची एकही संधी दिली नाही.

# ब्राझीलने केली पहिल्या विजयाची नोंद; हैतीचा पराभव

**फिलाडेल्फिया : वृत्तसंस्था**

पाच वेळचा फुटबॉल विश्वविजेता संघ असे बिरुद मिरवणाऱ्या ब्राझीलने हैतीचा ३–० असा पराभव करत फिफा २०२६ विश्वचषकातील आपल्या पहिल्या विजयाची नोंद केली. मॅथियस कुन्हाने केलेल्या दोन गोलांच्या जोरावर संघाने 'ग्रुप सी'मध्ये अव्वल स्थान गाठले आहे.

ब्राझील संघाला पहिल्या सामन्यात मोरोक्कोविरुद्ध १–१ अशा बरोबरीत समाधान मानावे लागले होते. त्यामुळे चाहत्यांच्या नजरा हैतीविरुद्धच्या सामन्याकडे लागल्या होत्या. सामन्याच्या २३व्या मिनिटाला ब्राझीलने खेळावर नियंत्रण मिळवले,



मात्र या पहिल्या गोलमध्ये नशिबाचीही थोडी साथ लाभली. विनिसियसने हैतीचा गोलरक्षक जॉनी प्लेसाइडच्या दिशेने शॉट मारला. गोलरक्षकाने तो शॉट अडवला खरा, पण डिफेंडर हॅनेस डेलक्रॉइक्सने बॉल क्लिअर करण्याचा प्रयत्न केला असता तो कुन्हाच्या अंगाला लागून थेट गोलपोस्टच्या रेषेबाहेर गेला. या स्वयंचलित गोलमुळे ब्राझीलला १–० अशी आघाडी मिळाली.

पहिल्या गोलमुळे ब्राझीलचा आत्मविश्वास वाढला आणि त्यांनी खेळावर पूर्ण वर्चस्व गाजवण्यास सुरुवात केली. ३६व्या मिनिटाला कुन्हाने सामन्यातील सर्वात प्रेक्षणीय गोल करत संघाला २–० अशी आघाडी मिळवून दिली. विनिसियसने दिलेल्या अचूक 'थ्रू बॉल'वर या स्ट्रायकरने रिकाम्या जागेचा अचूक फायदा घेतला आणि डाव्या पायाने एक उत्कृष्ट आणि वेगवान शॉट मारत बॉल थेट टॉप कॉर्नरमध्ये धाडला. पूर्वार्धाच्या भरपाई वेळेत ब्राझीलने आपला तिसरा गोल नोंदवला.

या विजयासह दक्षिण अमेरिकन संघ असणाऱ्या ब्राझीलचे चार गुण झाले असून ते मोरोक्कोसोबत संयुक्तपणे अव्वल स्थानावर आहेत. मोरोक्कोने यापूर्वीच स्कॉटलंडचा १–० असा पराभव केला होता. स्कॉटलंडचे तीन गुण आहेत, तर सलग दुसरा पराभव पत्करावा लागलेला हैतीचा संघ या स्पर्धेतून बाद होणारा पहिला संघ ठरला आहे.

# फिफा वर्ल्डकपमधील 'मिस्ट्री गर्ल'ची चर्चा

**ग्वादालाहारा : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप २०२६चा थरार सध्या मैदानात आणि मैदानाबाहेरही पहायला मिळत आहे, मात्र सध्या या महाकुंभात खेळाडूंच्या कामगिरीपेक्षा स्टेडियममधील एका 'मिस्ट्री गर्ल'ची सोशल मीडियावर सर्वात जास्त चर्चा रंगली आहे.



ग्वादालाहारा येथील 'एस्तादियो अक्रॉन' स्टेडियमवर झालेल्या मेक्सिको आणि दक्षिण कोरिया यांच्यातील हाय व्होल्टेज सामन्यादरम्यान या तरुणीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिचे नाव ओलिव्हिया बेथेल असून इंटरनेट जगतात ती 'एच टाऊन गर्ल' या नावाने प्रसिद्ध आहे.

ओलिव्हियाने मेक्सिकोच्या विजयानंतर स्टेडियममध्ये केलेल्या अनोख्या सेलिब्रेशनचा एक व्हिडीओ तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर केला होता. हा व्हिडीओ काही तासांतच इंटरनेटवर वाऱ्यासारखा व्हायरल झाला.

अमेरिकेतील ह्युस्टन येथे राहणारी ओलिव्हिया ही एक लोकप्रिय डिजिटल कंटेंट क्रिएटर आहे. ती मेक्सिको फुटबॉल संघाची कट्टर चाहती असून संघाला पाठिंबा देण्यासाठी ती प्रत्येक सामन्याला हजेरी लावते. यापूर्वी मेक्सिकोने दक्षिण आफ्रिकेचा २–० असा पराभव केला होता, त्या सामन्यानंतरही ओलिव्हियाचा स्टेडियममधील डान्स करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता.

# गौतम गंभीरला हटवा आणि धोनीला टीम इंडियाचा मेन्टॉर बनवा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी वेगवान गोलंदाज एस श्रीसंतने टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यावर जोरदार टीका केली आहे. भारतीय संघाला सध्या मुख्य प्रशिक्षकाची नव्हे, तर महेंद्रसिंह धोनी यांच्यासारख्या अनुभवी मेंटरची गरज असल्याचे मत श्रीसंतने व्यक्त केले.

'द लल्लनटॉप'ला दिलेल्या मुलाखतीत बोलताना श्रीसंतने भारतीय संघाच्या अलीकडील कामगिरीवर भाष्य केले. गेल्या काही वर्षांत कसोटी क्रिकेटमध्ये घरच्या मैदानावर भारताला अपेक्षित यश मिळाले नसल्याचे सांगत त्याने यासाठी गंभीर यांच्या कार्यकाळावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

भारतीय संघाच्या सध्याच्या कामगिरीबाबत बोलताना श्रीसंत म्हणाला की, सर्वप्रथम मुख्य प्रशिक्षक बदला. भारताला सध्या मुख्य प्रशिक्षकाची गरज नाही, तर एका चांगल्या मेंटरची आवश्यकता आहे. खेळाडूंशी प्रशिक्षकाचे नाते हे भावासारखे असायला

### श्रीसंतची 'बोलंदाजी'



हवे. त्याच्या मते, संघ जिंकत असताना आनंद व्यक्त करणे आणि पराभवानंतर राग दाखवणे हा योग्य दृष्टिकोन नाही. प्रशिक्षकाने खेळाडूंच्या प्रयत्नांचा आदर ठेवून त्यांना मार्गदर्शन करणे अधिक महत्त्वाचे आहे.

भारताच्या २०२६ टी–२० विश्वचषक विजयाचे संपूर्ण श्रेय गंभीर यांना देणे योग्य नसल्याचेही श्रीसंतने स्पष्ट केले. "संघाने विश्वचषक जिंकल्यानंतर सर्व श्रेय गंभीर यांना मिळाले, मात्र संजू सॅमसनचे योगदान, सूर्यकुमार यादवची नेतृत्वक्षमता आणि योग्य वेळी घेतलेले गोलंदाजीतील निर्णय यामुळेच भारताला यश मिळाले," असे श्रीसंत म्हणाला. याशिवाय आशीष नेहरा यांच्यासारखा खेळाडूंशी सातत्याने संवाद साधणारा प्रशिक्षक संघासाठी अधिक उपयुक्त ठरू शकतो, असे मतही त्याने व्यक्त केले.

### हरभजन सिंगला दिले आव्हान

या मुलाखतीत श्रीसंतने त्याचे सर्वाधिक चर्चेत राहिलेले कानाखाली मारण्याच्या प्रकरणावरही भाष्य केले. त्याने हरभजन सिंगविषयी बोलताना आपली नाराजी व्यक्त केली आणि हिंमत असेल तर समोर येऊन लढून दाखव असे म्हटले. "मी सध्या 'बेअर नकल फाइट लीग'मध्ये आहे. भज्जी, मी तुला आव्हान देतो. जर तुला त्या 'थप्पड प्रकरणा'ची आणि माझी इतकीच अडचण असेल आणि तू इतके पैसे कमवतोस तर मलाही कमवू दे. रिंगमध्ये ये. मी तुला मनापासून लढतीचे आमंत्रण देतो. जर थोडासाही स्वाभिमान असेल, तर जाहिराती वगैरे गोष्टी बाजूला ठेवूया. खरोखर, रिंगमध्ये ये. मी वाट पाहत आहे." श्रीसंतचा हा व्हिडीओ व्हायरल होत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com